दैनिक
# राज्य लोकतंत्र
www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... ©email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–२३९ | रविवार, दि.२२ डिसेंबर २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने– ६ | किंमत ३ रूपये




**संपादकीय**

## जाती–धर्मात अडकणे शोकांतीकाच!

राष्ट्रपुरुषांची स्मारके, प्रतिमा, त्यांच्या संदर्भातील वास्तू यांचे प्राणपणाने जतन करणे हे प्रत्येक भारतीयाचे कर्तव्य आहे. आजच्या काळात राष्ट्रपुरुषांच्या कार्याची, विचारांची आपण कधीही बरोबरी करू शकत नाही, त्यांच्याइतकी वैचारिक उंची आपण गाठू शकत नाही, त्यांचे कार्य लौकिकअर्थाने अलौकिक असेच असते. पण समाजातील विघातक अपप्रवृत्ती, नराधम मात्र कायदा–सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण करण्यासाठी, समाजामध्ये जातीय तेढ निर्माण करण्यासाठी, समाज व्यवस्थेमध्ये वादंग पसरविण्यासाठी असे कृत्य करून असुरी आनंद मिळवत असतात, पण ही एकप्रकारची विकृती असते.

## महाराष्ट्र विधानसभेचे हिवाळी अधिवेशन संपले



**नागपूर | प्रतिनिधी**

नागपूर येथे गेल्या सहा दिवसांपासून सुरू असलेल्या राज्य विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाचे शनिवारी सूप वाजले. विधिमंडळाचे पुढील अर्थसंकल्पीय अधिवेशन मुंबईत ३ मार्च २०२५ रोजी होणार असल्याचे जाहीर करण्यात आले. विधानसभा निवडणुकीनंतर गठित झालेल्या पंधराव्या विधानसभेचे पहिले अधिवेशन पार पडले. सहा दिवस पान २ वर

# बोगस पिकविम्यावरून सुरेश धस यांचे गंभीर आरोप

## सभागृहात पुराव्यासह केली पोलखोल, माजी कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्याकडे रोख

**नागपूर | प्रतिनिधी**

**मागील आठवडाभर बीड आणि परभणी येथील प्रकरणांवर विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहात घमासान चर्चा सुरू असताना अंतिम आठवड्यात बीड, परभणी आणि धाराशिव जिल्ह्यातील बोगस पिकविमा प्रकरणावरून भाजपचे आमदार सुरेश धस यांनी राज्य सरकारला घरचा आहेर दिला. या बोगस पीकविम्याच्या पॅटर्नला पंतप्रधान पिकविम्याचा परळी पॅटर्न असे नाव देत धसांनी महायुती सरकारच्या २०२३ आणि २०२४ च्या कार्यकाळातील कृषिमंत्र्यांवर गंभीर आरोप केले आहेत.** पान २ वर



### व्यक्तीची नावे आली कुठून?

ज्या व्यक्तींच्या नावे पीकविमा उतरवला जातो, त्या व्यक्तींची नावे बंजारा समाजात नाहीत. मग तरीही या आडनावाची व्यक्ती तांड्यावर आली कशी? तसेच एकट्या सोनपेठ तालुक्यात १३ हजार १९० हेक्टर बोगस पिकविमा उतरवला गेला, याची चौकशी झाली पाहिजे, अशी मागणीही धसांनी केली.

### सर्व प्रकरणाची चौकशी होणार–फडणवीस

अंतिम आठवडा प्रस्तावाला उत्तर देताना मुख्यमंत्री फडणवीसांनी पीकविम्यात घोटाळा करणाऱ्यावर कारवाई करू अशी ग्वाही दिली. फडणवीस म्हणाले, ''सरकार पीकविमा योजनेसाठी एवढ्या मोठ्या प्रमाणावर पैसे देते. परंतु ते शेतकऱ्यांना न मिळता बोगस प्रकरण करून अशी उखळली जात असतील तर त्याची नक्की चौकशी करू आणि दोषींवर कठोर कारवाई करू. केवळ बीडच नव्हे तर संपूर्ण राज्यात बोगस विमा काढला गेला असण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे त्याचा तपास करण्यात येईल,'' अशी ग्वाही फडणवीसांनी दिली.

# साहेब, वाल्मिक कराडच मास्टरमाईंड

## देशमुख कुटूंबाची शरद पवारांनी घेतली भेट ; आ. संदिप क्षीरसागरांकडून थेट हल्लाबोल, त्यानेच काशी केल्याचाही उल्लेख

**केज | प्रतिनिधी**

**बीडचे आमदार संदीप क्षीरसागर यांनी थेट धनंजय मुंडेंचे निकटवर्तीय असलेल्या वाल्मिक कराड यांचे नाव घेऊन तेच संतोष देशमुख प्रकरणातील मास्टरमाईंड असल्याचे शरद पवारांच्या समोरच सांगून टाकले. त्यानेच काशी केली असल्याचे सांगून त्यांच्यामुळेच बीड जिल्ह्यात जातीय तेढ निर्माण झाल्याचा गंभीर आरोप देखील त्यांनी केला. राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वेसर्वा शरद पवार यांनी शनिवारी बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावात भेट देऊन पीडित देशमुख कुटुंबीयांचे सांत्वन केले. यावेळी, खासदार बजरंग सोनवणे व आमदार संदीप क्षीरसागर हेही त्यांच्यासमवेत उपस्थित होते.**

शरद पवारांनी मृत संरपंच संतोष देशमुख यांच्या कुटुंबीयांशी संवाद साधत प्रकरणाची माहिती घेतली. त्यानंतर, त्यांच्या मुलींच्या शिक्षणाची जबाबदारी घेत असल्याचे जाहीर केले. यावेळी, ग्रामस्थांनी शरद पवारांसमोर आक्रोश करत धनंजय मुंडेंच्या राजीनाम्याची मागणी देखील मागणी केली. तसेच, आमदार–खासदारांनीही देखील या घटनेमागील सूत्रधार शोधून त्यांना अटक पान २ वर



### शरद पवारांचा रोख कुणाकडे

बीमध्ये जे घडले त्याने सर्वसामान्य लोकांना धक्का बसला. महाराष्ट्राच्या साखर उद्योगाला हातभार लावणार लोक इथे आहेत, अशा जिल्ह्यात जे घडले ते कुणालाही न पटणारे आहे. सरपंचाची हत्या झाली, जे घडले ज्यात काहीच संबंध नसताना त्यांची हत्या झाली, हे चित्र आतिशय गंभीर आहे. या घटनेची नोंद राज्य आणि केंद्र सरकारने घ्यावी. या घटनेत आरोपींचा संवाद कुणा–कुणासोबत झाला, हे शोधले पाहिजे. जितेंद्र आव्हाड यांनीसुद्धा हा प्रश्न विधानभवनात मांडला, ते कोणत्या जातीचे आहेत, समाजाचे आहेत हे त्यांनी बघितले नाही, असे म्हणत नाव न घेता शरद पवारांनी थेट वाल्मिक कराडांकडे निशाणा लावल्याचे पाहायला मिळाले आहे.

### करांडाच्या अटकेचे फडणवीसांकडून संकेत

नागपूर : नागपूरमध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची पत्रकार परिषद पार पडली. यावेळी वाल्मिक कराडला अटक होणार? असा प्रश्न पत्रकारांनी विचारला असता देवेंद्र फडणवीसांनी याबाबत उत्तर दिले आहे. ''मी कालही सांगितलं की, कोणालाही सोडलं जाणार नाही. पोलीस सगळ्यांचा मागोवा घेत आहेत. सर्वांना अटक होईल, असेही देवेंद्र फडणवीस म्हणाले. त्यामुळे फडणवीस यांच्याकडूनच वाल्मिक कराड यांच्या अटकेचे संकेत आहेत.

### सुत्रधार कोण याचा शोध घेतला पाहिजे–शरद पवार

राष्ट्रवादी शरद पवार गटाचे अध्यक्ष शरद पवार यांनी देखील मस्साजोगमध्ये जाऊन संतोष देशमुख यांच्या कुटुंबाची भेट घेतली. यावेळी बोलताना शरद पवार यांनी म्हटले की या घटनेच्या खोलात गेले पाहिजे, या घटनेचा सूत्रधार कोण आहे याचा शोध घेतला पाहिजे. राज्य सरकार आणि केंद्र सरकार या प्रकरणाच्या खोलात जाईपर्यंत आम्ही स्वस्त बसणार नाही, असे शरद पवार यांनी म्हटले आहे.

## नवनीत कॉवत बीडचे नवे पोलिस अधिक्षक

**बीड | प्रतिनिधी**

**मुख्यमंत्री फडणवीस यांनी शुक्रवारी बीडच्या पोलिस अधिक्षक अविनाश बारगळ यांच्या बदली संदर्भात आदेश दिले होते. त्यानंतर आज छत्रपती सभाजीनगर येथे उपायुक्त म्हणून असलेले नवनीत कॉवत यांची बीडचे पोलिस अधिक्षकपदी नियुक्ती आदेश काढले आहेत. एसपी म्हणून ही पहिलीच नियुक्ती आहे. ते २०१७ च्या बॅचचे आयपीएस आहेत.**



अविनाश बारगळ यांच्या बदलीची घोषणा काल सभागृहात करण्यात आली होती. त्यानंतर बीडला पोलीस अधिक्षक म्हणून कोण येणार याची सर्वांना उत्सुकता होती. या पदासाठी अनेक नावांची चर्चा असतानाच आता शासनाने नवनीत कावत यांची या पदावर नियुक्ती केली आहे. कावत मुळचे राजस्थानचे असुन २०१७ च्या बॅचचे आयपीएस आहेत. त्यांनी यापुर्वी धाराशिव येथे अतिरिक्त पोलीस अधीक्षक म्हणून काम केले आहे तर सध्या ते छत्रपती संभाजीनगर येथे पोलीस उपायुक्त होते. एक शांत पण ठाम अधिकारी अशी त्यांची ओळख आहे.

# धनंजय मुंडेंना मंत्रिमंडळातून काढून टाका

## मस्साजोग येथे अजितदादांसमोरच गावकऱ्यांची प्रचंड घोषणाबाजी

**केज | प्रतिनिधी**

**अजित पवार जेव्हा संतोष देशमुख यांच्या कुटुंबाला भेटण्यासाठी मस्साजोगमध्ये पोहोचले तेव्हा ग्रामस्थ चांगलेच आक्रमक झाले होते. धनंजय मुंडे यांना मंत्रिमंडळातून काढून टाका अशी जोरदार घोषणाबाजी गावकऱ्यांच्या वतीने करण्यात आली. धनंजय मुंडे यांनी पक्षपातीपणा केला आहे, त्यांना मंत्रिमंडळातून काढून टाका अशी मागणी येथील ग्रामस्थांकडून करण्यात आली.**

काही दिवसांपूर्वी बीड जिल्ह्यातल्या केज तालुक्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांचे अपहरण करून त्यांची हत्या करण्यात आली होती. या घटनेने राज्यभरात पान २ वर



### मास्टरमाईंड सुटणार नाही–अजित पवार

अजित पवार यांनी संतोष देशमुख यांच्या कुटुंबाची भेट घेतली. यावेळी बोलताना ते म्हणाले की, मी तुम्हाला शब्द देतो या प्रकरणातील मास्टर मांइड सुटणार नाही, असे सांगितले.

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले देशमुख परिवाराचे सांत्वन

### दोषी व्यक्तींना कठोर शासन होईल याची दिली ग्वाही

**मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या खुन्यांना कठोर शिक्षा होईल या दृष्टिकोनातून शासन काम करीत आहे याप्रकरणी दोषी व्यक्तींना फाशी दिली जाईल यासाठी मी स्वत: या प्रकरणात पूर्ण लक्ष देणार आहे अशी ग्वाही देतो असे राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मस्साजोग येथे देशमुख यांच्या कुटुंबीयांच्या सांत्वन प्रसंगी सांगितले.**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज मस्साजोग येथे भेट दिली. दिवंगत देशमुख यांची पत्नी, मुलगी तसेच भाऊ धनंजय देशमुख यांच्याशी त्यांनी घटनेबाबत चर्चा करून माहिती घेतली व शासन सर्व प्रकारे या प्रकरणात तपास करून देशमुख कुटुंबाला न्याय मिळवून देईल पान २ वर

### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,
बीड,दि.२१ डिसेंबर २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
| --- | --- | --- | --- |
| गहू: १.०० क्विंटल | ३,१५० | ३,१५० | ३,१५० |
| ज्वारी/हायब्रिड: १९.०० क्विंटल | २,३१० | २,५०३ | २,४०६ |
| मका/लोकल: ७.०० क्विंटल | २,१५० | २,१५० | २,१५० |
| तूर : २.०० क्विंटल | ७,४५० | ७,४५० | ७,४५० |
| उडीद : ११.०० क्विंटल | ६,३०० | ७,३०० | ६,७४० |
| बाजरी: ५.५० क्विंटल | २,०८१ | २,९५७ | २,६५२ |
| मुग : २.०० क्विंटल | ७,३०० | ७,३०० | ७,३०० |
| सोयाबीन: १००.०० क्विंटल | ४,००० | ४,००० | ४,००० |
| हरभरा: १.५० क्विंटल | ५,८०० | ५,८०० | ५,८०० |

## खातेवाटप जाहिर; पंकजा मुंडे-पर्यावरण, धनंजय मुंडेंकडे अन्न व नागरी पुरवठा

### गृह खातं फडणवीसांकडे, अर्थ अजितदादांकडे, एकनाथ शिंदे यांच्याकडे नगरविकास






**मुंबई | प्रतिनिधी**

**महायुती सरकारचं बहुप्रतिक्षित खातेवाटप अखेर जाहीर झालं आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे गृह खातं हे कायम आहे. तर अजित पवार यांच्याकडे अर्थ खातं देण्यात आलं आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे नगरविकास खातं देण्यात आलं आहे. तर संतोष देशमुख हत्या प्रकरणामुळे धनंजय मुंडे यांच्यावर अनेक आरोप झाले. त्यामुळे त्यांना दुय्यम दर्जाचं खातं देण्यात आलं आहे.**

महायुती सरकारने अखेरीस खातेवाटप पान २ वर

## जुनी कार घेणेही महागले!

### जीएसटी काऊन्सिलची बैठक; काय स्वस्त, काय महाग?

**नवी दिल्ली | वृतसंस्था**

**अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या अध्यक्षतेखाली जैसलमेरमध्ये जीएसटी परिषदेची बैठक झाली. यावेळच्या बैठकीत आरोग्य आणि आयुर्विमा प्रीमियमवरील कर कमी होईल, अशी अपेक्षा होती. मात्र याबाबतचा निर्णय तूर्तास स्थगित करण्यात आला आहे. तर आता जुनी कार खरेदी करणे सुध्दा महागले आहे.**

जीएसटी काऊन्सिलच्या बैठकीत काय निर्णय घेण्यात आला, याबाबत काही मीडिया रिपोर्ट्समध्ये दावे केले जात आहेत. टाईम्स ऑफ इंडियाने दिलेल्या पान २ वर


# छगन भुजबळ–धनंजय मुंडेंना घेरले

## कट्टर विरोधक आ. सुरेश धस, सुहास कांदे अजित पवारांच्या भेटीला

**नागपुर | प्रतिनिधी**

**छगन भुजबळ मंत्रीपद न मिळाल्याने नाराज आहेत. तर धनंजय मुंडेंवर विरोधकांनी गंभीर आरोप केले आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसमधल्या या दोन्ही नेत्यांच्या कट्टर विरोधकांनी मात्र अजित पवारांची भेट घेतली आहे. आ. सुहास कांदे आणि आ. सुरेश धस यांनी नागपुरात अजित पवारांची भेट घेतल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. एकंदरीत वेगवेगळ्या मुद्द्यावर कांदे आणि धस यांच्याकडून भुजबळ आणि मुंडे यांना घेरल्याचे दिसत आहे.**

लोकसभा निवडणुकीनंतर बीड जिल्ह्याचे राजकारणच बदलून गेले. जातीपातीचे राजकरण सुरु झाल्याने सामाजिक वातावरणही दुषित झाले आहे. विधानसभा निवडणुकीनंतर तर मुंडे बहिण –भाऊ विरुध्द आ. सुरेश धस असाच सामना पहायला मिळत आहे. धसांकडून धनंजय मुंडे यांच्यावर आरोपांवर आरोप केले जात आहेत. तर दुसरीकडे विधानसभा निवडणुकीतील संघर्ष नाशिक जिल्ह्यात कांदे–भुजबळांमध्ये अजूनही सुरुच आहे. त्यामुळे सुहास कांदे आणि छगन भुजबळांचे वैर सर्वश्रुत आहे. शिवसेना शिंदे गटाचे आमदार सुहास कांदे यांनी नागपुरातल्या शासकीय निवासस्थानी जाऊन अजित पवारांनी भेट घेतली. यानंतर दादांनी नाशिकला न्याय दिला, अशी खोचक प्रतिक्रियाही पान २ वर






## अग्रलेख

# जाती–धर्मात अडकणे शोकांतीकाच !

राष्ट्रपुरुषांची स्मारके, प्रतिमा, त्यांच्या संदर्भातील वास्तू यांचे प्राणपणाने जतन करणे हे प्रत्येक भारतीयाचे कर्तव्य आहे. आजच्या काळात राष्ट्रपुरुषांच्या कार्याची, विचारांची आपण कधीही बरोबरी करू शकत नाही, त्यांच्याइतकी वैचारिक उंची आपण गाठू शकत नाही, त्यांचे कार्य लौकिकअर्थाने अलौकिक असेच असते. पण समाजातील विघातक अपप्रवृत्ती, नराधम मात्र कायदा–सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण करण्यासाठी, समाजामध्ये जातीय तेढ निर्माण करण्यासाठी, समाज व्यवस्थेमध्ये वादंग पसरविण्यासाठी असे कृत्य करून असुरी आनंद मिळवत असतात, पण ही एकप्रकारची विकृती असते.

या विकृतांच्या असुरी आनंदाची प्रचलित समाजव्यवस्थेला फार मोठी किंमत मोजावी लागते, झालेली हानी भरून निघते, पण समाजामध्ये निर्माण झालेली तेढ, भावनिक जखमा भरून निघण्यास अनेक वर्षे निघून जातात. भारतीय समाज हा संवेदनशील व भावनाशील आहे. त्यातच भारतामध्ये विविधतेतून एकता हे पालूपद वारंवार आळविले जात असले तरी हे वाक्य सुभाषित म्हणून केवळ भिंतीवरच आजच्या काळात शोभून दिसते. विविध जातीधर्मियांचा भारतात समावेश असला तरी भारतीय समाज आजही जाती–धर्माच्या चौकटीतच अडकला आहे व त्या बंधनातच विखुरला गेला आहे. त्या जातीधर्माच्या चौकटी तोडून तो आजही देशाचा, देशाच्या अखंडतेचा विचार करत नाही, ही वास्तविकता असली तरी खऱ्या अर्थाने ती एक शोकांतिकाच आहे. राष्ट्रपुरुषदेखील आज आम्ही भारतीयांनी जातीधर्मात वाटून घेतले आहे. त्यामुळे राष्ट्रपुरुषदेखील जातीधर्माच्या चौकटीत बंदिस्त झाले आहेत. मुळात महापुरुषांना जाती–धर्माच्या चौकटीमध्ये अडकवून ठेवण्याचा तुम्हा–आम्हाला कोणी अधिकार दिला? महापुरुषांच्या स्मारकांची विटंबना, त्यांच्याशी संबंधित साहित्याची अथवा वास्तूची विटंबना ही नक्कीच संवेदनशील व अक्षम्य बाब आहे. अशी निंदनीय घटना करणारा विकृत कोणत्याही जातीचा–समाजाचा असो, त्याला कदापी माफी मिळू नये. अशा घटना घडवून आणण्यामागे कोणाचे तरी षडयंत्र असते. समाजात कायदा–सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण व्हावा, जातीय दंगली व्हाव्यात, जाती–जातींमध्ये वाद निर्माण व्हावेत, हा हेतू अशा घटना घडवून आणण्यामागे त्या अपप्रवृत्तींचा असतो. त्यांच्या याच कुटिल खेळीला आपण बळी पडतो, हे आजवर विविध घटनांमध्ये दिसून आले आहे आणि यातूनच त्या विकृत नराधमांचा हेतू साध्य होतो.

मुळातच अशा घटना घडल्यानंतर सर्वप्रथम आम्ही भारतीयांनी थंड डोक्याने अशा घटनांचा आढावा घेऊन शोध घेतल्यास त्या नराधमांना धडा शिकविणे अवघड जाणार नाही. अहिंसा करून अशा घटनांची भरपाई होणे शक्य आहे का? याचाही आज थंड डोक्याने विचार करण्याची वेळ आली आहे. अशा घटना घडताच आपण संयम व सहनशीलता गमावून बसतो व त्यातूनच उद्रेक जन्माला येतो. जमावाला डोके नसते आणि रागाला विचार करता येत नाही. अशाच घटनांना यातून खतपाणी नकळत घातले जाते. राष्ट्रपुरुषांची स्मारके पुन्हा उभारली जातील, पण समाजव्यवस्थेचे रागाच्या भरात झालेले नुकसान पुन्हा भरून येणे शक्य नाही. राष्ट्रपुरुषांच्या कार्याचे व विचारांचे संवर्धन झाल्यास आपला समाज नजीकच्या काळात नक्कीच सुजलाम सुफलाम होईल. मुळातच राष्ट्रपुरुषांचे कार्य, त्यांचा जीवनपट आजही अनेकांना माहिती नसतो. केवळ तो कोणीतरी मोठा माणूस आहे आणि आपल्या समाजाचा आहे व अशा घटनांतून आपल्या समाजाला कमी लेखण्याचा प्रयत्न केला जात आहे, असा विचार डोक्यात ठेऊन समाज रस्त्यावर उतरतो. मुळातच राष्ट्रपुरुषांना विशिष्ट जातीधर्माच्या चौकटीत बंदिस्त करण्याचे पातक आम्ही करत आहोत.

नराधम एकदा कृत्य करतो; परंतु राष्ट्रपुरुषांना, त्यांच्या कार्याला, जीवनपटाला विशिष्ट जातीधर्माच्या चौकटीत बंदिस्त करण्याचे पातक आम्ही वर्षानुवर्षे करत आहोत. आम्हीही तितकेच दोषी आहोत. मुळात परभणीत घडलेली घटना ही पहिलीच नाही. महाराष्ट्रात नव्हे तर देशातही अशा घटना अनेकदा घडल्या आहेत. ११ जुलै १९९७ रोजी मुंबईतील घाटकोपरमधील रमाबाई नगरामध्ये घटनाकारांच्या स्मारकाच्या झालेल्या विटंबनेची फार मोठी किंमत मुंबईला चुकवावी लागली आहे. अशा घटना घडणे निंदनीय आहे. अशा घटनांना पायबंद बसणे काळाची गरज आहे. घटना घडल्यावर उद्रेक न करता शांतपणे विचार करून संयम दाखविल्यास गुन्हेगारांना धडा शिकविणे सोप्पे जाते व समाजाचे नुकसानही टळते.

# श्री साईराम कडून गुंतवणूकदारांची ४० लाखांची फसवणूक

## अंबड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

**अंबड । प्रतिनिधी**

**जास्तीचे व्याज मिळत असल्यामुळे पैसे ठेवी ठेवणारे व्यक्तींना कोणतेही नियमाचं विचार न करता पैसे ठेवल्यामुळे ही परिस्थिति निर्माण झाली आहे याला जबाबदार कोण असे काही पतसंस्थेचे चेअरमन संचालक मंडळ यांच्याकडून बोलल्या जात आहे. असाच प्रकार आज अंबड मध्ये साईराम अर्बन मल्टीस्टेट मध्ये उघडकीस आला. ज्ञानराधा मल्टीस्टेट, राजस्थानी मल्टीस्टेट या दोन मोठ्या वित्तीय संस्थांनी गुंतवणूकदारांची कोट्यावधीची फसवणूक केल्यानंतर आता श्री साईराम अर्बन मल्टीस्टेट को–ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी मुख्य शाखा बीड असलेल्या या संस्थेच्या अंबड शाखेने गुंतवणूकदारांची फसवणूक केली आहे.**

श्री साईराम मल्टीस्टेट सोसायटीची अंबड शहरात एक शाखा आहे. २०२१ मध्ये या शाखेत गुंतवणूक करण्यासाठी शाखेच्या व्यवस्थापकांनी ग्राहकांना शोधण्यास काम सुरुवात केली. त्याच दरम्यान झिरपी येथे दवाखाना असणारे डॉक्टर पदवी व हुशार अनुभव डॉक्टर सावंत यांनी जास्त मिळत असल्याने मोठ्या प्रमाणात पैसे साई राम मध्ये ठेवले तसेच ज्ञानराधा मध्ये सुद्धा जास्त व्याज मिळत असल्यामुळे मोठ्या प्रमाणात रक्कम असल्याचे बोलल्या जात आहे याप्रकरणी त्यांनी मोठे आंदोलन केलेले आहे सध्या डॉक्टर श्री सावंत हे सुरंगे नगर अंबड येथे राहत आहे. डॉक्टर लक्ष्मण भीमराव सावंत वय ३८ या वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्या व्यक्तीशी जास्तीचे व्याज मिळत असल्यामुळे साई राम अर्बनचा संपर्क आला. मुलांच्या भवितव्यासाठी लक्ष्मण सावंत यांनी पाच लाख रुपये या वित्तीय संस्थेत ठेवले. त्यापैकी एक लाख रुपये मुदत ठेव तर उर्वरित चार लाख रुपये हे बचत खात्यात ठेवले. परंतु गेल्या काही दिवसांपूर्वी मुदत ठेवीची मुदत संपल्यानंतरही पैसे मिळत नव्हते आणि बचत ठेवीचे पासबुक भरून मिळत नव्हते त्यामुळे आपली फसवणूक झाल्याची त्यांना शंका आली आणि त्यांच्यासह इतरही काही ग्राहकांना सेवा मिळत नसल्यामुळे या ग्राहकांनी दिनांक एक जून रोजी अंबड पोलीस ठाण्यामध्ये तक्रार दिली होती. या तक्रारीच्या अनुषंगाने पोलिसांनी चौकशी करून आणि ग्राहकांनी देखील व्यवहार सुरळीत होतील या आशेवर आत्तापर्यंत वाट पाहिली, परंतु आज या ग्राहकांचा बांध फुटला आणि आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आले. त्यानुसार आज या बँकेचे संस्थापक अध्यक्ष साईनाथ परभने तसेच उपाध्यक्ष, बँकेचे संचालक मंडळ, व्यवस्थापक आणि या सर्व घटनांना जबाबदार असलेल्या पदाधिकाऱ्यांच्या विरोधात अंबड पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद केला आहे. भारतीय न्याय संहिता ३१६(२)(५)६१(२) अन्वये हा गुन्हा दाखल केला आहे. लक्ष्मण सावंत यांच्यासोबतच जयश्री वराडे, गोरख वराडे, विष्णू कानकाटे, राजू शिंदे, अतुल गाडे, रमेश गाडे, रमेश बांगर, लता बांगर, विलास बांगर, मधुकर पालवे, दिपाली खवले, आदींच्या यामध्ये नावे आहे पुढील तपास पोलीस करीत आहे.

# पत्रकार तुकाराम शिंदे यांचे निधन

अंबड । प्रतिनिधी



तीर्थपुरी ता. घनसावंगी येथील दैनिक सकाळचे पत्रकार तथा मत्स्योदरी विद्यालयाचे शिक्षक तुकाराम नाथाची शिंदे यांचे आज शनिवारी (ता. २०) पहाटे १:३० वाजता हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले असून त्यांच्यावर तीर्थपुरी येथेच सकाळी १०:३० वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले त्यांच्या त्यांच्या पश्चात आई,पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, भाऊ आई भावजयी असा मोठा परिवार आहे वीस ते पंचवीस वर्षापासून पत्रकारिता पूर येथे काम करीत असून त्यांच्या लेखनात कृषी हा विषय हा अत्यंत जिव्हाळ्याचा होता त्यांच्या निधनाने परिसरात सर्वत्र व्यक्त करण्यात येत आहे.

# लायसन नसताना व्यापाऱ्याकडून कापुस खरेदी यामुळे मापात पाप

## दगडासह टेम्पोचे वजन करून शेतकऱ्याला फसवलं; बाजार समिती कारवाई करणार का?

जालना । पतिनिधी

शेतकऱ्यांचा कापसाचं कापूस वजन करण्याआधी टेम्पोत दगडं ठेवून टेम्पोचे काट्यावर वजन करायचे आणि नंतर संधी साधून रस्त्यात ते दगडं फेकून द्यायचे. मग शेतकऱ्याचा कापूस भरल्यानंतर पुन्हा कापसासह टेम्पोचे वजन करायचे. यामध्ये दगडाच्या वजना इतका कापूस कमी भरत असे. असा फंडा वापरून कापुस व्यापाऱ्यांनी वलखेडा (ता. अंबड) गावातील शेतकऱ्यांची फसवणूक केल्याचा प्रकार घडला आहे. तसेच याप्रकरणी संबंधित कापूस खरेदी व्यापाऱ्याकडे कापूस खरेदी करण्याचे लायसन नसल्याचे बोलल्या जात आहे. परंतु याबाबत अंबड कृषी उत्पन्न समितीकडून चौकशी करणे अपेक्षित आहे अशी मागणी शेतकऱ्याकडून करण्यात येत आहे. तसेच कापूस व्यापारी यांचा वलखेड या गावांमध्ये मामा असल्याचे बोलल्या जात आहे. परंतु या प्रकरणी अंबड पोलीस स्टेशन मध्ये काही राजकीय क्षेत्राकडून राजकारण केल्या जात असल्याचे बोलल्या जात आहे.

अंबड तालुक्यातील वलखेडा गावातील अरुण रमेशराव धुपे यांनी अंबड पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, दि. १५ डिसेंबर रोजी ३ वाजेच्या सुमारास कापूस व्यापारी गजानन वसंतराव राठोड (रा. सोमनाथ जळगाव तांडा ता. जि. जालना) आणि रमेश राधेशाम पवार (रा. बाजीउम्रद ता. जि. जालना) हे आमच्या गावात कापुस खरेदी करण्यासाठी गावाकडे जात असतांना आपण त्या टेम्पोच्या मागे जात होतो. अंदाजे ४.३० वाजेच्या सुमारास टाटा टेम्पो (एम. एच. ०४ एच. डी. ८९०७) हा वलखेड शिवारातील रस्त्याच्याकडेला असलेल्या तलावाजवळ थांबलेला दिसला. तेव्हा गजानन राठोड व रमेश पवार हे सदर टेम्पोमधुन ५ ते ६ दगडे खाली फेकतांना दिसले. त्यावर आपण त्यांना म्हटले की, हे दगडे तुम्ही गाडीतून खाली का फेकली आहे. त्यावर त्यांनी तुला काय करायचे आहे असे उत्तर दिले, तुम्ही आमच्या गावातील तुम्ही दि. ११ डिसेंबर रोजी ७ हजार १०० रुपये दराने माझा ३५ क्विंटल कापुस खरेदी केला होता. तो काटा केल्यानंतर ३२.३० क्विंटलच भरला होता. तुम्ही माझी देखील फसवणुक केली आहे, असे म्हणताच त्यांनी अरुण धुपे यांना टाटा टेम्पोमध्ये बसवले व त्यांच्याजवळील १२ हजार रुपये किमतीचा मोबाईल हिसकावुन घेतला तसेच चापटबुक्यांनी मारहाण करुन त्यांच्या खिशातील १९ हजार रुपयेही जबरदस्तीने काढून घेतले कापूस व्यापाऱ्यांनी त्यांना गाडीच्या बाहेर उतरुन दिले व ते टेम्पो घेवून निघुन गेले. त्यानंतर गावातील विलास माणीकराव धुपे, संभाजी सर्जेराव गायकवाड, नरहरी डिगांबर धुपे, परमेश्वर रामधन राठोड हे दुचाकीवरुन आले व ते अरुण धुपे यांना गावाकडे घेवून गेले. या पूर्वीही सदर व्यापारी राठोड व पवार यांनी गावातील शेतकऱ्यांचा कापुस खरेदी करुन त्यांची फसवणूक केली आहे, असे धुपे यांनी आपल्या फिर्यादीत म्हटले आहे. या प्रकरणी अरुण धुपे यांच्या फिर्यादीवरुन अंबड पोलीस ठाण्यात गजानन वसंतराव राठोड व रमेश राधेश्याम पवार यांच्या विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस करीत आहे

# संत पुंजाराम महाराज पुण्यतिथी निमित्त त्रिदिनिय सोहळा संपन्न

**जालना । प्रतिनिधी**

संत पुंजाराम महाराज पुण्यतिथी निमित्त २२ वा त्रि दिनिय सोहळा दिनांक २१ डिसेंबर रोजी भावीक भक्ताच्या गजरात नाव्हा (ता.जालना)येथे पार पडला. सलग तीन दिवस महाप्रसादाचा लाभ पंचक्रोशीतील भावीक भक्तांनी घेतला. या कार्यक्रमानिमित्त कीर्तन तसेच भगवान महाराज आनंद गडकर यांच्या हस्ते काल्याचे किर्तन ही पार पडले. श्रींच्या पालखीची मिरवणूक टाळ मृदुंगाच्या गजरात



काढण्यात आली. भक्तिमय कार्यक्रमामुळे भावी भक्ताच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता. या मठाचे मठाधिपती विशाल महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. या सोहळ्यासाठी विविध जिल्ह्यातून भावीक भक्त मोठ्या प्रमाणात आले होते.

# सरकारने जनतेच्या तोंडाला पाने पुसली

## विदर्भ व मराठवाड्याच्या प्रश्नांवर अधिवेशनात चर्चाच नाही–नाना पटोले

**नागपूर । प्रतिनिधी**

विदर्भ व मराठवाड्याच्या जनतेला न्याय देण्यासाठी हिवाळी अधिवेशनात चर्चा होणे अपेक्षित होते पण अशी कोणतीच चर्चा झाली नाही. मविआ सरकार असताना याच अधिवेशनात शेतकरी कर्जमाफीची घोषणा केली होती पण भाजपा युती सरकारने शेतकरी कर्जमाफीचे आश्वासन देऊनही कर्जमाफीची घोषणा केली नाही. गडचिरोलीत विपुल खनिज संपत्ती आहे ती लाडका उद्योगपती लुटत आहे. धारावी प्रकल्प अदानीलाच देण्याचा निर्णय सरकारने केला आहे. अधिवेशनातून सरकारने जनतेच्या तोंडाला पाने पुसली आहेत. भाजपा युती सरकार हे गरीब, तरुण, शेतकऱ्यांचे नाही तर मुठभर श्रीमंताचे आहे, असा हल्लाबोल काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केला.

हिवाळी अधिवेशनाचे सुप वाजल्यानंतर महाविकास आघाडीच्या पत्रकार परिषदेत बोलताना नाना पटोले यांनी सरकारवर तोफ डागली, ते पुढे म्हणाले की, बीड व परभणीतील घटना माणुसकीला काळीमा फासणाऱ्या आहेत, सरकारने गुंडगिरी पोसल्याचे परिणाम बीडमध्येही दिसले. पोलीसांमध्येही गुंडाराज आले आहे का? असा प्रश्न पडतो. परभणीत पोलिसांनी कोंबिंग ऑपरेशन केले, त्यात अनेकांना जबर मारहाण केली, सोमनाथ सुर्यवंशी यांचा मृत्यू पोलीस मारहाणीत झाला पण मुख्यमंत्री फडणवीस यांनी पोलिसांचा बचाव केला. परभणी प्रकरणात फक्त एका पोलीस अधिकाऱ्याची बदली करण्यात आली. निष्णात वकिलाप्रमाणे मुख्यमंत्र्यांनी बीड प्रकरणात एका मंत्र्याला वाचवण्याचा प्रयत्न केला. मुख्यमंत्री आपली खूर्ची वाचवण्यासाठी मित्रपक्षांच्या मंत्र्यांना घाबरतात असे दिसते असा आरोपही यावेळी केला. विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यावेळी म्हणाले की, सरकारने अधिवेशनात मागील काळातीलच



काही योजना सांगितल्या, विदर्भाच्या वाट्याला काहीही मिळाले नाही. कायदा व सुव्यवस्थेची स्थिती अत्यंत बिघडलेली आहे. बीड प्रकरणातील मुख्य आरोपी वाल्मिक कराड अजून फरार आहे, त्याला कोणाचा पाठिंबा आहे ते सर्वांना माहिती आहे. परभणी घटनेत पोलिसांच्या लाठीमारात सोमनाथ सुर्यवंशी यांचा मृत्यू झाला, कल्याणमध्ये मराठी माणसावर अन्याय करणारी घटना घडली असल्याचेही यावेळी सांगितले. पुरवणी मागण्या या फक्त खर्चासाठी होत्या विकासासाठी यात एका पैशाचीही तरतूद नाही. विदर्भ व मराठवाड्यातील काही सिंचन प्रकल्पावर मुख्यमंत्री बोलले पण त्यासाठी आर्थिक तरतूद करण्यात आलेली नाही. कांदा निर्यात मुल्य २० टक्के हटवण्यावर निर्णय नाही. शेतकऱ्यासाठी काहीच नाही. अनुदानही दिले नाही. ईव्हीएम सरकारने जनतेला न्याय दिला नाही. विरोधी पक्ष म्हणून सरकारला अधिवेशनात जाब विचारला यापुढेही मजबुतीने सरकारला जाब विचारत राहू असेही यावेळी दानवे यांनी सांगितले. या पत्रकार परिषदेला काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, शिवसेना आमदार सचिन अहिर, सुनिल प्रभू आदी उपस्थित होते.

## पान १ वरून...

### बोगस पिकविम्यावरून सुरेश

खरे म्हणजे शेतकऱ्यांना पीकविम्याचे वेळेवर पैसे मिळत नाहीत. २०२३ खरीप आणि रब्बी हंगामातील पैसे शेतकऱ्यांना मिळाले नाहीत, अशी शेतकऱ्यांची तक्रार आहे. पण दुसरीकडे मात्र बोगस नावावर पीकविमा काढून पैसे उकळले जात आहेत. त्यामुळे हा प्रकार गंभीर आहे. धस यांनी आरोप करताना मात्र कृषिमंत्र्यांचे नाव घेतले नाही. त्यामुळे राज्याचे माजी कृषिमंत्री आणि विद्यमान महायुती सरकारमधील मंत्री दादा भुसे यांनी कृषिमंत्र्यांचे नाव घ्या, जेणेकरून गोंधळ होणार नाही, अशी विनंती केली. परंतु विधीमंडळाच्या नियमाप्रमाणे मी नाव घेणार नाही, असे म्हणत धसांनी कृषिमंत्री मुंडे यांचे नाव घेण्याचे टाळले. परंतु सुरेश धस ज्या कार्यकाळातील बोगस पिकविम्यातील प्रकरणांवर आक्रमक झाले आहेत, तो कार्यकाळ पाहता या काळात राज्याचे कृषिमंत्री होते धनंजय मुंडे. त्यामुळे धसांचा रोख मुंडेंकडे होता हे स्पष्ट होत आहे. धसांनी पीकविम्यातील प्रकरण नेमके काय आहे तेही उलगडून सांगितले. धस यांच्या आरोपानुसार, बीड जिल्ह्यातील पिकविमा माफीया परभणी जिल्ह्यात पिकविमा काढत आहेत. म्हणजे ज्यांच्या नावावर एक गुंठाही क्षेत्र नाही, अशा व्यक्ति शेतकऱ्यांच्या नावावर पीकविमा उतरवून घोटाळा केला जात आहे. परभणी जिल्ह्यातील सोनपेठ तालुक्यातील रामनगर तांड्यावरच्या एकाच सीएससी सेंटरवरून पीकविमा काढला गेला. त्यातून तांड्यावर ४ हजार हेक्टर क्षेत्राचा पीकविमा उतरवला गेला. प्रत्यक्षात एका तांड्यावर सगळ्या शेतकऱ्यांचे मिळून एवढे क्षेत्र होतंच नाही मग तरीही पीकविमा उतरवला गेला कसा? असा प्रश्नही धस यांनी उपस्थित केला.

**परभणी जिल्ह्यात परळीच्या व्यक्तींची नावे**

एक रुपयात पिकविम्याची घोषणा राज्य सरकारनेच केली, पण शेतकऱ्यांना मात्र विम्याचे पैसे मिळत नाहीत. त्याचे कारण म्हणजे पीकविम्याचा परळी पॅटर्न असे म्हणत धस यांनी महायुती सरकारला घरचा आहेर दिला. बीड जिल्ह्यात ७ हजार हेक्टरवर बोगस पीकविमा उतरवला गेला. तसेच धाराशिव जिल्ह्यात ३ हजार हेक्टर बोगस पिकविमा उतरवले म्हणून गुन्हे दाखले झाले. तर परभणीत २०२३ साली १५ ते २० हजार हेक्टरवर बोगस पिकविम्याचा घोटाळा झाला. तसेच यंदा आत्तापर्यंत ४० हजार हेक्टरवर बोगस पीकविमा उतरवला गेला. आणि यामध्ये परळी तालुक्यातील व्यक्तींची नावे आहेत, याकडेही धसांनी सभागृहाचे लक्ष वेधले.

---------------

### महाराष्ट्र विधानसभेचे

चाललेल्या या अधिवेशनात १७ विधेयके मंजूर करण्यात आली आहेत. अंतिम आठवडा प्रस्तावावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, नागपूरचे अधिवेशन हे अंतरिम अधिवेशन असते. या अधिवेशनात प्रश्नोत्तरं ठेवत नाही. या अधिवेशनात पुरवणी मागण्या आल्या पाहिजेत हे आपले सरकार म्हणून धोरण असते. सात दिवस अधिवेशन सुरु होते. बऱ्याच गोष्टींवर चर्चा झाली. आमच्यासाठी हे सरकार नव्याने आले असले तरीही मागच्या अडीच वर्षांच्या कामालाच पुढे चालू ठेवले जाणार आहे. अधिवेशनात विधानसभेच्या एकूण सहा बैठका झाल्या. यात ४६ तास २६ मिनिटे कामकाज झाले. १० मिनिटांचा वेळ वाया गेला. दररोज सरासरी ७ तास ४४ मिनिटे कामकाज चालले. अधिवेशनात सदस्यांची ८७.८० टक्के सर्वाधिक उपस्थिती होती. तर ४८.३७ टक्के सर्वात कमी उपस्थिती नोंदवली गेली, अशी माहिती विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी यावेळी दिली.

------------

### साहेब, वाल्मिक कराडच

करण्याची मागणी केली. यावेळी बोलताना आ. क्षीरसागर म्हणाले, पीडित देशमुख कुटुंबीयांच्या शिक्षणाची जबाबदारी साहेबांनी घेतली आहे. पण, देशमुख कुटुंबीयांसाठी आमदार, खासदार म्हणून तुम्ही गावकरी जे जबाबदारी द्याल ती आम्ही स्वीकारू. सगळ्यात महत्त्वाचे साहेब, ह्या मागे मास्टरमाईंड वाल्मिक कराड आहे, त्यानेच ही काशी केली. आपल्याला रडून जमणार नाही. आम्ही मी आणि बप्पांनी हा विषय सभागृहातही मांडला आहे. भविष्यातही लोकप्रतिनिधी म्हणून आम्ही गप्प बसणार नाही. उद्या सर्वच पक्षांची बैठक आम्ही बोलवत आहोत. खंडणीच्या प्रकरणात वाल्मिक कराडचे नाव टाकले आहे, जे ६ तारखेला टाकले पाहिजे होते. त्यातही अटक झाले नाही, ३०२ मध्येही मुख्य सुत्रधार तोच आहे. कुटुंबीय देखील त्याचं नाव घ्यायला घाबरत आहेत, दोन समाजात भांडणं लावण्याचं कामही त्यानेच केल आहे, असे म्हणत संदीप क्षीरसागर यांनी थेट वाल्मिक कराड यांनाच आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले आहे.

--------------

### धनंजय मुंडेंना मंत्रिमंडळातून

खळबळ उडाली. या घटनेचे पडसाद विधानसभेत देखील उमटले. आरोपींवर कठोर कारवाई व्हावी, पीडित कुटुंबाला न्याय मिळावा अशी मागणी आमदारांकडून करण्यात आली. दरम्यान आज राष्ट्रवादी शरद पवार गटाचे अध्यक्ष शरद पवार यांनी मस्साजोगमध्ये जाऊन संतोष देशमुख यांच्या कुटुंबाची भेट घेतली. दरम्यान शरद पवार यांच्या भेटीनंतर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी देखील आजच देशमुख कुटुंबाची भेट घेतली आहे.

अजित पवार जेव्हा संतोष देशमुख यांच्या कुटुंबाला भेटण्यासाठी मस्साजोगमध्ये पोहोचले तेव्हा ग्रामस्थ चांगलेच आक्रमक झाले होते. धनंजय मुंडे यांना मंत्रिमंडळातून काढून टाका अशी जोरदार घोषणाबाजी गावकऱ्यांच्या वतीने करण्यात आली. धनंजय मुंडे यांनी पक्षपातीपणा केला आहे, त्यांना मंत्रिमंडळातून काढून टाका अशी मागणी येथील ग्रामस्थांकडून करण्यात आली. यावेळी बोलताना एका ग्रामस्थाने म्हटले की, 'माझे म्हणण असे आहे की आपले मुख्यमंत्री त्यांच्याकडे गृहखातं आहे. चांगले म्हणून त्यांचे नाव आहे, देशभरात महाराष्ट्राच्या गृहमंत्रालयाचा दबदबा आहे. मात्र तेरा दिवस झाले तरी यांना तीन आरोपी सापडत नाहीत, याचा अर्थ काय? असा सवाल या ग्रामस्थाने उपस्थित केला आहे. यावेळी ग्रामस्थ चांगलेच आक्रमक झाले होते. जनतेच्या मनात रोष असल्याचे यावेळी स्पष्ट दिसत होते.

-------

### उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी

असे सांगितले. सदर घटना ही माणुसकीला काळीमा फासणारी घटना आहे असेही ते म्हणाले. शासनाच्या वतीने मी श्रद्धांजली अर्पण करतो असे श्री. पवार म्हणाले. त्यांनी दिवंगत देशमुख यांच्या प्रतिमेला पुष्पांजली अर्पण केली. पोलीस आपल्या पद्धतीने तपास करीत आहेत सोबतच न्यायालयीन चौकशी सुरू असून यात कुठलीही त्रुटी राहणार नाही असे सांगून उपमुख्यमंत्री श्री. पवार म्हणाले की, या घटनेमागे कोणी मास्टरमाईंड असेल तर त्यालाही सोडले जाणार नाही. यावेळी श्री पवार यांच्या समवेत ज्येष्ठ नेते रमेश आडसकर,डॉ. योगेश क्षीरसागर तसेच आदि उपस्थित होते.

------------

### जुनी कार घेणेही

वृत्तानुसार ५० टक्के पेक्षा जास्त फ्लाय ऍश असलेले ऑटोक्लेव्हड एरेटेड कॉंक्रिट ब्लॉक एचएस कोड ६८१५ अंतर्गत ठेवलेले आहेत. यानंतर त्यांच्यावर पूर्वीपेक्षा कमी जीएसटी आकारला जाईल, जो पूर्वी १८ टक्के होता आणि आता तो १२ टक्के करण्यात आला आहे. वापरलेल्या कारच्या विक्रीशी संबंधित व्यवहारांवर जीएसटी १२ टक्क्यांवरून १८ टक्क्यांपर्यंत वाढवण्यास मंजुरी देण्यात आली आहे. यामध्ये इलेक्ट्रिक वाहनांचा समावेश आहे. फोर्टिफाइड तांदळावर ५% कर एकसमान दर लागू केला जाईल. याचा उपयोग कोणत्याही उद्देशासाठी केला गेला तरी दर कायम राहतील. यापूर्वी त्यावर वेगवेगळे कर लागू होते. त्यामुळे करप्रणाली थोडी अवघड झाली होती. रेडी टू इट पॉपकॉर्न खाणेदेखील आता परवडणारे नाही. जीएसटीबाबत परिषद यासंदर्भात निर्णय झालाय. मीठ आणि नमकीनसारखे मसाले असलेले पॉपकॉर्न पॅकेजिंगशिवाय विकल्यास त्यावर ५% जीएसटी लागू होईल. याशिवाय प्री–पॅकेज केलेल्या आणि लेबल केलेल्या पॉपकॉर्नवर १२% भरावा लागेल. असे असताना १७०४ ९० ९० कोड अंतर्गत मिठाई म्हणून वर्गीकृत केलेल्या कॅरमल पॉपकॉर्नसारख्या साखर–लेपित वाणांवर १८% लागू होईल. विमा प्रीमियमवरील निर्णय जीएसटी काऊन्सिलने पुढे ढकलला आहे. त्यामुळे लोकांना आपल्या इन्शुरन्सवर आधीच्या टॅक्स दराप्रमाणे प्रिमियम जमा करावा लागेल. प्रत्यक्षात मंत्र्यांच्या गटात यावर एकमत होऊ शकले नाही.

--------------

### खातेवाटप जाहिर; पंकजा मुंडे–पर्यावरण,

जाहीर केलं आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे गृह, ऊर्जा, न्याय व विधी, सामान्य प्रशासन, माहिती व प्रसारण व खातेवाटप न झालेल सर्वच खातं असणार आहे. तर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे ग्रामविकास मंत्रालय, गृहनिर्माण, सार्वजनिक बांधकाम विभाग ही खाती असणार आहे. तर उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे अर्थ व नियोजन, राज्य उत्पादन शुल्क या खात्यांचा भार असणार आहे. चंद्रशेखर बावनकुळे – महसूल, राधाकृष्ण विखेपाटील – जलसंधारण ( गोदावरी व कृष्णा खोरे विकास). हसन मुश्रीफ – वैद्यकीय शिक्षण, चंद्रकात पाटील – उच्च व तंत्रशिक्षण, संसदीय कामकाजमंत्री, गिरीश महाजन – जलसंधारण (विदर्भ, तापी, कोकण विकास), आपत्ती व्यवस्थापन, गणेश नाईक – पर्यटन, गुलाबराव पाटील – पाणीपुरवठा, दादा भुसे – शालेय शिक्षण, संजय राठोड – माती व पाणी परीक्षण, धनंजय मुंडे – अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण, मंगलप्रभात लोढा – कौशल्य विकास, रोजगार, उद्योग व संशोधन, उदय सामंत – उद्योग व मराठी भाषा, जयकुमार रावल – विपणन, प्रोटोकॉल, पंकजा मुंडे – पर्यावरण व वातावरण बदल, पशुसंवर्धन, अतुल सावे – ओबीसी विकास, दुग्धविकास मंत्रालय, ऊर्जा नुतणीकर, अशोक उईके – आदिवासी विकास मंत्रालय, शंभुराज देसाई – पर्यटन, खाण व स्वातंत्र्य सैनिक कल्याण मंत्रालय

------------

### छगन भुजबळ–धनंजय

कांदेंनी दिली आहे. बीडमधील सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणाचे राज्यभरात पडसाद उमटले आहेत. भाजप आमदार सुरेश धस या प्रकरणावरून मंत्री धनंजय मुंडेंवर आक्रमक आरोप करत आहेत. अशा परिस्थितीत सुरेश धस यांनी अजित पवारांनी भेट घेतली आहे. धनंजय मुंडे आणि अजित पवारांची भेट होत नसताना सुरेश धस यांनी मात्र अधिवेशन काळात दुसऱ्यांदा अजित पवारांनी भेट घेतल्याने अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत. मात्र पीकविम्याच्या प्रश्नासाठी भेट घेतल्याचे कारण धस यांनी सांगितले आहे. भुजबळ आणि मुंडे हे दोघेही अजित पवार यांचे जवळचे सहकारी आहेत. मात्र आता या दोघांच्या कट्टर विरोधकांनीच अजित दादांकडे चकरा वाढवल्याने भुजबळ आणि मुंडे यांच्या अडचणीत वाढ होण्याची शक्यता आहे.

cmyk

राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

रविवार, दि.२२ डिसेंबर २०२४



## संत पुंजाराम महाराज पुण्यतिथी निमित्त त्रिदिनिय सोहळा संपन्न

**जालना । प्रतिनिधी**

संत पुंजाराम महाराज पुण्यतिथी निमित्त २२ वा त्रि दिनिय सोहळा दिनांक २१ डिसेंबर रोजी भावीक भक्ताच्या गजरात नाव्हा (ता.जालना)येथे पार पडला.

सलग तीन दिवस महाप्रसादाचा लाभ पंचक्रोशीतील भावीक भक्तांनी घेतला. या कार्यक्रमानिमित्त कीर्तन तसेच भगवान महाराज आनंद गडकर यांच्या हस्ते



काल्याचे किर्तन ही पार पडले. श्रींच्या पालखीची मिरवणूक टाळ मृदुंगाच्या गजरात काढण्यात आली. भक्तिमय कार्यक्रमामुळे भावी भक्ताच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता. या मठाचे मठाधिपती विशाल महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. या सोहळ्यासाठी विविध जिल्ह्यातून भावीक भक्त मोठ्या प्रमाणात आले होते.

# विदर्भ, मराठवाड्यासह उर्वरित महाराष्ट्राचा समतोल विकास साधणार -मुख्यमंत्री

## विदर्भ, मराठवाड्यातील सिंचन प्रकल्प, औद्योगिक प्रकल्प पूर्णत्वाला नेणार; गडचिरोलीतील नक्षलवाद आटोक्यात आणणार

- विदर्भात आंतरराष्ट्रीय दर्जाचे वनपर्यटन, जलपर्यटन
- मराठवाड्यातील वॉटरग्रीड प्रकल्प मार्गी लावणार
- पिक विमा कंपन्यांच्या गैर प्रकारांची सखोल चौकशी

**नागपूर । प्रतिनिधी**

विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र, कोकणातील मागास भागासह उर्वरित महाराष्ट्राचा समतोल विकास साधत महाराष्ट्रातील जनतेला न्याय देणार असल्याची ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत दिली. विदर्भ, मराठवाड्यातील सिंचन प्रकल्प, औद्योगीक प्रकल्प पूर्णत्वाला नेणार असून मराठवाड्यातील वॉटरग्रीट प्रकल्प मार्गी लावणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. गडचिरोली स्टील सिटी म्हणून उदयास येत असून येत्या तीन वर्षात गडचिरोलीतील नक्षलवाद आटोक्यात आणणार असल्याचे त्यांनी सांगितले. त्याचबरोबर पीक विमा कंपन्यांच्या गैरप्रकरांना आळा घालण्यासाठी या प्रकरणाची सखोल चौकशी करणार असल्याचे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सभागृहात स्पष्ट केले.अंतिम आठवडा प्रस्तावावरील चर्चेला उत्तर देताना मुख्यमंत्री श्री. फडणवीस विधानसभेत बोलत होते.

विदर्भातील सिंचन

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, विदर्भातील सिंचनाचे क्षेत्र वाढविण्यासाठी वैनगंगा-पैनगंगा-नळगंगा नदी जोड प्रकल्प येत्या सात वर्षात मार्गी लावणार आहे. ८८ हजार कोटींच्या या प्रकल्पामुळे १० लाख एकर जमिन ओलिताखाली येणार आहे. या प्रकल्पामुळे ५५० किलो मिटर लांबीची नवी नदीच तयार होणार असून यामुळे विदर्भात मुबलब पाणी उपलब्ध होणार आहे. नाग नदी सुधाराला मान्यता मिळाली आहे. नाग-पोहरा-पिवळी नदी असा प्रकल्प असून सांडपाणी या नद्यांमध्ये जाऊ नये यासाठी प्रयत्न सुरू आहेत. यामुळे औद्योगिक क्षेत्रात देखील वाढ होण्यास मदत होईल. मुबलक पाण्यामुळे विदर्भाच्या औद्योगिक विकासालाही गती मिळेल. विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्रातील प्रकल्पांसाठी बळीराजा योजनेमुळे सिंचन क्षेत्र वाढणार आहे. प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना सिंचन क्षेत्र वाढण्यासाठी उपयुक्त ठरत आहे. कन्हान नदी वळण योजनेला मंजूरी दिली असून ३२०० एकर जमिन सिंचनाखाली येणार आहे.

**विदर्भात आंतरराष्ट्रीय दर्जाचे वनपर्यटन, जलपर्यटन**

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, केंद्र आणि राज्य सरकारने मोठी गुंतवणूक केल्याने गोसी खुर्द प्रकल्पाच्या माध्यमातून जलपर्यटनाच्या संधी उपलब्ध होणार आहेत. अभोरा येथे जलपर्यटन तर भंडारा, नागपूर, चंद्रपूर,



गोंदिया या ठिकाणी वनपर्यटन सुरू करण्यात येणार आहे. यामुळे प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत. विशेष म्हणजे आंतरराष्ट्रीय दर्जाचे हे पर्यटन स्थळ निर्माण करण्यात येणार आहे.

**विदर्भातील औद्योगिक विकास**

गडचिरोली-चंद्रपूर-वर्धा-भंडारा-नागपूर या प्राधान्य क्रमाने खनिकर्म (मायनिंग) प्रकल्प हाती घेतले आहेत. यामध्ये गडचिरोली ५० हजार कोटींची औद्योगिक गुंतवणूक झाली असून खनिजावर आधारित प्रकल्पामुळे गडचिरोली स्टील प्रकल्प म्हणून उदयाला येत आहे. चंद्रपूर येथे कोल गॅसिफिकेशन प्लँट करण्याचा निर्णय झाला आहे. या प्रकल्पाचा सामंजस्य करार होऊन केंद्राची मान्यता देखील मिळाली आहे. रामटेक, भंडारा येथील फेरो अलाय क्लस्टर डेव्हलपमेंटमुळे रोजगार निर्मिती होणार आहे. एशियन डेव्हलपमेंट बँकेच्या सहाय्याने नागपूर मेट्रो प्रकल्प-२ पूर्ण करण्यात येणार आहे. कापूस ते कापड आणि कापड ते फॅशन संकल्पना अमरावतीच्या टेक्सटाईल पार्कमध्ये पूर्ण केली असल्याचे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

**शेतकऱ्यांना मदत**

अवकाळी पावसामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना जवळपास १६ हजार २१९ कोटी रुपयांचा निधी देण्यात आला आहे. तर धान उत्पादक शेतकऱ्यांना प्रति हेक्टरी २० हजार रुपये बोनस देण्यात येत असल्याचे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले. वर्धा अमरावती अकोला आणि बुलढाणा या जिल्ह्यातील ५५ हजार शेतकऱ्यांच्या संत्रा पिकांची गळती झाली होती. या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी तीन हेक्टर क्षेत्र मर्यादित प्रमाणे जवळपास १६५ कोटी रुपयांची मदत देण्यात आली असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

सोयाबीन व कापूस उत्पादकाला योग्य मदत दिली जात असून राज्यात ५५७ हमी भाव खरेदी केंद्रावर आतापर्यंत जवळपास २३ लाख ६८ हजार ४७५ क्विंटल इतकी सोयाबीन खरेदी करण्यात आली आहे. मागील पंधरा वर्षाच्या तुलनेत ही मोठी खरेदी आहे. ही खरेदी केंदे १२ जानेवारीपर्यंत सुरू राहणार आहेत. मध्यप्रदेशच्या धरतीवर खरेदी व्यवस्था सुरू करण्यासंदर्भात संबंधित अधिऱ्यांना सूचना दिल्या आहेत असे मुख्यमंत्री म्हणाले.

**मराठवाडा औद्योगिक विकासाचे दालन**

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, राज्यात उद्योगांना पायाभूत सुविधा उपलब्ध करून दिल्यामुळे उद्योजकांचा कल राज्याकडे वाढला असून पुण्यानंतर संभाजीनगर व जालना ही दोन मोठी औद्योगिक क्षेत्र म्हणून पुढे येत असल्याने मराठवाडा औद्योगिक विकासाचे मोठे दालन होत आहे. वंदे भारत ट्रेन लातूरच्या कोच फॅक्टरीत तयार होत असल्याने या ठिकाणी रोजगाराची मोठी संधी उपलब्ध झाली आहे. टोयोटा प्रकल्प ऑरिक सिटीमध्ये आल्याने रोजगारच्या मोठी संधी उपलब्ध झाली आहे. या ठिकाणी ऑटोमोबाईल ईको सिस्टीम व्हावी म्हणून कुशल मनुष्य बळ निर्माण होण्यासाठी प्रशिक्षण केंद्र उभारले आहे. शिरूर ते छ. संभाजी नगर हा १४ हजार ८८६ कोटींचा ग्रीन फिल्ड मार्ग तयार करण्यात येत आहे. मराठवाडा,विदर्भातील शेतकऱ्यांना दुग्घव्यवसाय करता यावा यासाठी मदत डेअरीची मदत घेऊन दुग्धव्यवसायाला चालना देण्यात येणार आहे.

**अलमट्टी धरणाची उंची**

सध्या अलमट्टी धरणाच्या उंचीचा प्रश्न चर्चेत असून कोल्हापूर, सांगली येथील शेतकरी, सामान्य नागरिक यांची जिवित हानी, मालमत्ता नुकसान होणार नाही यासाठी राज्य सरकार योग्य ती खबरदारी घेईल, असे ते म्हणाले.

**पीक विमा गैरप्रकारांची सखोल चौकशी**

नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्यांच्या पिकाचे नुकसान होते यातून सावरण्यासाठी शासनाने पीक विमा योजना सुरू केली. शेतकऱ्यांसाठी ही चांगली योजना आहे. या योजनेबाबत सदस्यांनी काही गंभीर मुद्दे सभागृहात उपस्थित केले आहेत. त्यामुळे बीडसह राज्यातील अन्य जिल्ह्यात या योजनेबाबत काही गैरप्रकार घडल्या संदर्भात सखोल चौकशी केली जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

**मुंबई गोवा महामार्ग**

मुंबई गोवा या महामार्गाच्या कामातील अडचणी दूर करण्यात करण्यात आल्या आहेत. युध्दपातळीवर या प्रकल्पाचे काम सुरू असून हा महामार्ग पूर्ण होईल असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला. ठाणे महापालिका विकास आराखडा संदर्भात सूचना व हरकती मागवण्यात आल्या आहेत. या सूचना हरकतींवर सुनावणी घेऊन योग्य निर्णय घेण्याचे निर्देश अधिकाऱ्यांना दिले आहेत. त्याचबरोबर संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील रहिवाशांच्या पुनर्वसनाचा प्रश्न सोडविणार आहे असे स्पष्ट करत मुख्यमंत्री म्हणाले की, गेल्या अडिच वर्षात हाती घेतलेली कामे प्राधान्याने पूर्णत्वाला नेण्यात येणार आहेत.

## श्री गणेश विद्या मंदिर शाळेत बालआनंद मेळावा उत्साहात

**अंमळनेर । प्रतिनिधी**

अंमळनेर(भांड्याचे) येथील रयत शिक्षण संस्थेच्या श्री गणेश विद्या मंदिर शाळेमध्ये नाविन्यपूर्ण उपक्रमांतर्गत, आनंददायी शनिवारच्या निमित्ताने बालआनंद मेळावा उत्साहात पार पडला.सदर मेळाव्यामध्ये विविध प्रकारच्या खाद्यपदार्थांचे तसेच कृषीमालाचे स्टाल्स विक्रीसाठी लावले होते.त्याचबरोबर विद्यार्थ्यांनी बनविलेल्या शैक्षणिक साहित्यांचे प्रदर्शनदेखील आयोजित करण्यात आले होते.रयतच्या श्री गणेश विद्या मंदीर शाळेत नेहमीच नाविन्यपूर्ण उपक्रम राबविले जातात.त्यानुसार बालआनंद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.कार्यक्रमाचे उद्घाटन अंमळनेरचे माजी सरपंच अर्जुन आबा पवार, युवा पत्रकार अविराज पवार, गांधनवाडी ग्रा.पं.सदस्य व शिक्षणप्रेमी



पालक विष्णू उंडे, संतोष पवार,दीपक राऊत, धनंजय शेवंते, माजी विद्यार्थी रवी चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यानंतर पाहुण्यांचे स्वागत करून बाल आनंद मेळाव्याचे उद्घाटन करण्यात आले. सदर मेळाव्यात विद्यार्थ्यांनी समोसा, वडापाव,भजी, पाणीपुरी, भेळ, इडली,आप्पे, कांदेपोहे, गुलाबजामुन, सरबत, लस्सी, मठ्ठा यासह विविध प्रकारच्या खाद्यपदार्थांचे तसेच विविध पालेभाज्या,फळभाज्या व फळांचेदेखील स्टॉल्स लावले होते. खाद्यपदार्थांचा आस्वाद घेण्यासाठी विद्यार्थ्यांची एकच झुंबड उडाली होती. सदर मेळाव्यात विद्यार्थ्यांनी स्वतः बनवलेले शैक्षणिक साहित्याचे प्रदर्शन देखील भरवण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी स्वनिर्मित तक्ते, प्रतिकृती तरंगचित्रे यासारखे जवळपास १२५ प्रकारचे शैक्षणिक साहित्य प्रदर्शनात मांडले होते. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा तसेच त्यांना व्यवहार ज्ञानाची ओळख व्हावी यासाठी सदर बालआनंद मेळाव्याचे आयोजन करण्यात आल्याचे शाळेचे सहशिक्षक रामहरी खलाटे सरांनी सांगितले. बालआनंद मेळाव्याच्या यशस्वी आयोजनासाठी प्रभारी मुख्याध्यापक आर एम हाके,ज्येष्ठ शिक्षक जाधवर , पठाण , डूचे, गाडीलोहार , उडाणे , सानप, काळे, काकडे सदावर्ते, केंद्रे,श्रीमती मेढे मॅडम पंडागळे मॅडम आंधळे मॅडम सुळे मॅडम जाधव मडम, कचरे मॅडम हुलगुंडे सर, आव्हाड सर,आजिनाथ पोकळे मामा,मोरे मामा यांसह सर्व सेवकांचे मोलाचे सहकार्य लाभले.

## छत्रपती शाहू महाराज वाचनालयात माता भिमाई व संत गाडगेबाबा स्मृतीदिन साजरा

वडवणी । प्रतिनिधी

छत्रपती शाहू महाराज सार्वजनिक वाचनालय मौजे पिंपरखेड येथे माता भिमाई रामजी आंबेडकर आणि संत गाडगे महाराज यांचा स्मृती दिन विविध सामाजिक उपक्रमांनी साजरा करण्यात आला.

पिंपरखेड येथील छत्रपती शाहू महाराज वाचनालयात या वाचनालयाचे सचिव तथा पिंपरखेड गावचं भूषण असलेलं अत्यंत मनमिळावू व्यक्तिमत्व प्राध्यापक प्रकाश खळगे सर यांच्या नेतृत्वाखाली विविध सामाजिक उपक्रम वर्षभर चालू असतात. विविध महापुरुषांच्या जयंती, स्मृतिदिन या ठिकाणी साजरे होतात. गावातील शेकडो विद्यार्थी विद्यार्थिनी या ठिकाणी येऊन संस्काराची शिदोरी मिळवत असतात. माता भिमाई आंबेडकर आणि संत गाडगेबाबा यांच्या स्मृतिदिन या वाचणालयात साजरा करण्यात आला. यावेळी विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात आले. उपस्थित विद्यार्थ्यांना प्राध्यापक प्रकाश खळगे सर यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमासाठी ग्रंथालयाच्या कर्तव्यदक्ष सहाय्यक ग्रंथपाल सौ. शीलाताई सुखदेव उजगरे, अंगणवाडी ताई श्रीमती अग्नि आण्णाभाऊ खळगे, शाळेतील वाचक विद्यार्थीही मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## बाळराजे पवारांच्या वाढदिवसानिमित्त गिताभाभींच्या हस्ते शालेय साहित्यांचे वाटप

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई मतदार संघाचे माजी आमदार आदरणीय श्री लक्ष्मण आण्णा पवार यांचे मोठे बंधू भाग्यविधाते आदरणीय दैवत श्री बाळराजे दादा पवार यांच्या वाढदिवसानिमित्त ताकडगाव येथे सामाजिक उपक्रम, अंतर्गत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा ताकडगाव येथे शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले ह्या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती, गेवराई तालुक्याच्या रणरागिणी आमचे दैवत आदरणीय सौ, गिता भाभी पवार ह्यांच्या हस्ते शालीय साहीत्य वाटप करण्यात आले,




यावेळी प्रमुख उपस्थिती भाजपा महिला आघाडीच्या तालुका अध्यक्ष आदरणीय सौ.रत्नमाला,नानी मोटे, यावेळी उपस्थित गावातील महिला सौ,अनिता केदार, श्रीमती,सत्यशिला गिरी श्रीमती, सावित्रा मोटे, श्रीमती निलावती पालेकर, यावेळी शाळेचे विद्यार्थी शिक्षक, शाळेचे प्रभारी मुख्याध्यापक श्री शिवाजी सानप, श्री काशिद सर,श्री प्रदीप सराफ सर, श्री भगवान कोळी सर श्रीमंती,कल्पना,जाधव.मॅडम, श्रीमती रेणुका शेळके मॅडम, शाळेचे शिक्षक इत्यादी उपस्थित गावातील नागरिक, या कार्यक्रमाचे,आयोजन श्री शिवाजी पवार,माजी ग्रामपंचायत सदस्य श्री मनोज, केदार ,अविनाश मोटे, भाजपा दिव्यांग विकास आघाडी गेवराई तालुका अध्यक्ष श्री दत्ता गिरी , श्री कल्याण मोटे,श्री लक्ष्मीकांत पालेकर, ,श्री नामदेव मोटे केले,, होते, यावेळी उपस्थित माजी सरपंच विजय डोळस,जालीदंर केदार,ग्रामपंचायत सदस्य, श्री अनंत मोटे, ग्रामपंचायत सदस्य,श्री आप्पा मोटे श्री,कैलास मोटे,, गावातील जेष्ठ नागरिक श्री आत्माराम राऊत, श्री शंकर मोटे,श्री कारभारी काकडे व ईतर ताकडगावातील,गावातील नागरिक या सदरील कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री प्रल्हाद शिंदे सर यांनी केले व आभार प्रदर्शन, प्रदीप सराफ सर यांनी केले उपस्थित होते,

## आ. अर्जूनराव खोतकर यांच्या अध्येक्षतेखाली महानगरपालिकेमध्ये पाणीपुरवठा संदर्भात बैठक

जालना । प्रतिनिधी

२१ डिसेंबर रोजी आमदार श्री. अर्जुनराव खोतकर यांनी जालना शहर महानगरपालिकेत शहरातील पाणी पुरवठा संदर्भात आढावा बैठक घेतली. यावेळी जालना शहर महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक श्री. संतोष खांडेकर, पाणी पुरवठा विभागातील सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. बैठकीत उपस्थितांनी शहरातील विविध समस्या मांडल्या. शहरातील पाणी पुरवठा सुरळीत व नियमित होण्यासाठी मा. आमदार श्री. अर्जुनराव खोतकर यांनी संबंधितांना सुचना दिल्या.



यावेळी मा. आयुक्त तथा प्रशासक श्री. संतोष खांडेकर, श्री केशव कानपुडे यांनी मनपात राबवित असलेल्या विविध योजना उपक्रमाबाबत माहिती दिली तसेच मनपाच्या आकृतीबंधास लवकर मान्यता मिळाल्यास तातडीने पदभरती करण्यात येवुन मनपाच्या कामकाजास मदत होईल असे सर्वांना संबोधित केले.

यावेळी मा. श्री. भास्कर अंबेकर, अॅड. श्री. विष्णु पाचफुले, मा. श्री. राजेश राऊत, मा. श्री. अशोक पांगारकर, शाह आलम खान, सुनिल किनगांवकर, अॅड. भास्कर मगरे, राजेंद्र राख, पंडीतराव भुतेकर, अॅड. राहुल हिवराळे, रवि राऊत, अन्वर बेग, श्रीमती. संध्या ताई देठे, राजेद्र जाधव, गोपी गोगडे, संतोजी वाघमारे, संजय देठे, मयुर अग्रवाल, किरण गरड, शरद भांगदरे, राहुल रत्नपारखे, अर्जुन बजाज, अर्जुन गेडी, अभय कारवा, हेमंत ठक्कर , कृष्णा पठाडे, सुरेश केशापुरे, संजय देशमुख, विजय मुंडे, श्री. महेश बुलगे व आदींची उपस्थिती होती. तसेच यावेळी मनपातील सर्व अधिकारी, कर्मचारी, स्वच्छता निरीक्षक, शहरातील व्यापारी, नागरिकांची उपस्थिती होती.

# लायसन नसताना व्यापाऱ्याकडून कापुस खरेदी; मापात पाप

## दगडासह टेम्पोचे वजन करून शेतकऱ्याला फसवलं; बाजार समिती कारवाई करणार का?

जालना । प्रतिनिधी

शेतकऱ्यांचा कापसाचं कापूस वजन करण्याआधी टेम्पोत दगडं ठेवून टेम्पोचे काट्यावर वजन करायचे आणि नंतर संधी साधून रस्त्यात ते दगडं फेकून द्यायचे. मग शेतकऱ्याचा कापूस भरल्यानंतर पुन्हा कापसासह टेम्पोचे वजन करायचे. यामध्ये दगडाच्या वजना इतका कापूस कमी भरत असे. असा फंडा वापरून कापुस व्यापाऱ्यांनी वलखेडा (ता. अंबड) गावातील शेतकऱ्यांची फसवणूक केल्याचा प्रकार घडला आहे. तसेच याप्रकरणी संबंधित कापूस खरेदी व्यापाऱ्याकडे कापूस खरेदी करण्याचे लायसन नसल्याचे बोलल्या जात आहे. परंतु याबाबत अंबड कृषी उत्पन्न समितीकडून चौकशी करणे अपेक्षित आहे अशी मागणी शेतकऱ्याकडून करण्यात येत आहे. तसेच कापूस व्यापारी यांचा वलखेड या गावांमध्ये मामा असल्याचे बोलल्या जात आहे. परंतु या प्रकरणी अंबड पोलीस स्टेशन मध्ये काही राजकीय क्षेत्राकडून राजकारण केल्या जात असल्याचे बोलल्या जात आहे.

या संदर्भात अधिक माहिती अशी की, अंबड तालुक्यातील वलखेडा गावातील अरुण रमेशराव धुपे यांनी अंबड पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, दि. १५ डिसेंबर रोजी ३ वाजेच्या सुमारास कापूस व्यापारी गजानन वसंतराव राठोड (रा. सोमनाथ जळगाव तांडा ता. जि. जालना) आणि रमेश राधेशाम पवार (रा. बाजीउम्रद ता. जि. जालना) हे आमच्या गावात कापुस खरेदी करण्यासाठी

गावाकडे जात असतांना आपण त्या टेम्पोच्या मागे जात होतो. अंदाजे ४.३० वाजेच्या सुमारास टाटा टेम्पो (एम. एच. ०४ एच. डी. ८९०७) हा वलखेड शिवारातील रस्त्याच्याकडेला असलेल्या तलावाजवळ थांबलेला दिसला. तेव्हा गजानन राठोड व रमेश पवार हे सदर टेम्पोमधुन ५ ते ६ दगडे खाली फेकतांना दिसले. त्यावर आपण त्यांना म्हटले की, हे दगडे तुम्ही गाडीतून खाली का फेकली आहे. त्यावर त्यांनी तुला काय करायचे आहे असे उत्तर दिले, तुम्ही आमच्या गावातील

तुम्ही दि. ११ डिसेंबर रोजी ७ हजार १०० रुपये दराने माझा ३५ क्विंटल कापुस खरेदी केला होता. तो काटा केल्यानंतर ३२.३० क्विंटलच भरला होता. तुम्ही माझी देखील फसवणुक केली आहे, असे म्हणताच त्यांनी अरुण धुपे यांना टाटा टेम्पोमध्ये बसवले व त्यांच्याजवळील १२ हजार रुपये किमतीचा मोबाईल हिसकावुन घेतला तसेच चापटबुक्यांनी मारहाण करुन त्यांच्या खिशातील १९ हजार रुपयेही जबरदस्तीने काढून घेतले

कापूस व्यापाऱ्यांनी त्यांना गाडीच्या बाहेर उतरुन दिले व ते टेम्पो घेवून निघुन गेले. त्यानंतर गावातील विलास माणीकराव धुपे, संभाजी सर्जेराव गायकवाड, नरहरी डिगांबर धुपे, परमेश्वर रामधन राठोड हे दुचाकीवरुन आले व ते अरुण धुपे यांना गावाकडे घेवून गेले. या पूर्वीही सदर व्यापारी राठोड व पवार यांनी गावातील शेतकऱ्यांचा कापुस खरेदी करुन त्यांची फसवणूक केली आहे, असे धुपे यांनी आपल्या फिर्यादीत म्हटले आहे.

या प्रकरणी अरुण धुपे यांच्या फिर्यादीवरुन अंबड पोलीस ठाण्यात गजानन वसंतराव राठोड व रमेश राधेश्याम पवार यांच्या विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस करीत आहे.

# कांद्याच्या दरात घसरण, शेतकरी आक्रमक

## येवला बाजार समितीत कांद्याचे लिलाव पाडले बंद

सध्या राज्यातील कांदा उत्पादक शेतकरी संकटात आहे. कारण दिवसेंदिवस कांद्याच्या दरात घसरण होत आहे. यामुळं शेतकऱ्यांसह () विविध संघटना आक्रमक होताना दिसत आहेत. गेल्या चार ते पाच दिवसापासून कांद्यात घसरण सुरु असल्यामुळं नाशिक जिल्ह्यातील येवला बाजार समितीत छावा संघटना व शेतकऱ्यांनी लिलाव बंद पाडले आहेत. मनमाड-येवला मार्गावर रास्ता रोको आंदोलन सुरु आहे.

काय आहेत शेतकऱ्यांच्या मागण्या?

दरम्यान, कांद्यावरील २० टक्के निर्यात शुल्क रद्द करा, शेतकऱ्यांना २५ रुपये किलो प्रमाणे अनुदान द्या अशा मागण्या शेतकऱ्यांनी केल्या आहेत. नाफेड व एन.सी.सी.एफ.ने प्रोड्युसर कंपनीच्या माध्यमातून कांदा खरेदीत भ्रष्ट्राचार झाल्यानं त्याची चौकशी करावी अशी मागणी देखील शेतकऱ्यांनी केली आहे. दरम्यान, गेल्या काही दिवसापासून कांद्याच्या दरात सातत्यानं घसरण होत आहे. याचा मोठा आर्थिक फटका शेतकऱ्यांना बसत आहे. त्यामुळं शेतकरी चिंतेत आहेत. आधीच कांद्याचा उत्पादन खर्च वाढत असताना मिळणारा दर कमी असल्याची माहिती शेतकऱ्यांनी



दिली आहे. शेतकऱ्यांना मोठा आर्थिक फटका

गेल्या काही दिवसापासून कांद्याच्या दरात चांगलीच वाढ होत असल्याचं चित्र पाहायला मिळत होतं. सरकारच्या सर्व प्रयत्नांनंतरही कांद्याने आपला भाव कायम ठेवली होती. कांद्याचे दर हे ५००० ते ६००० प्रति क्विंटलच्या आसपास पोहोचले होते. मात्र, सध्या दरात घसरण होत असल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. सरकारी यंत्रणांमार्फत कांद्याची खुलेआम विक्री होत असली तरी त्याचा पुरवठा पुरेसा होत नाही. तसेच देशातील अनेक राज्यांमध्ये गेल्या महिनाभरापासून सातत्याने किरकोळ दर ६० ते ८० रुपये प्रतिकिलो होते. मात्र, सध्या कांदा २००० प्रतिक्विंटल ते २५०० रुपयांच्या आसपास विकत आहे. तर काही ठिकाणी १५०० रुपयांच्या आसपास कांद्याचे दर घसरले आहेत. याचा मोठा आर्थिक फटका शेतकऱ्यांना बसत आहे.

२० टक्क्यांचं निर्यात शुल्क रद्द करावं

देशांतर्गत बाजारात अचानक कांद्याची मोठ्या प्रमाणात आवक वाढली आहे. या वाढलेल्या आवकेमुळं कांद्याच्या दरात घसरण झाल्याचं बोललं जात आहे. तसेच दुसरा मुद्दा म्हणजे कांद्याच्या निर्यातीवर लावण्यात आलेलं २० टक्क्यांचं निर्यात शुल्क याचा देखील परिणाम कांद्याच्या दरावर झाल्याचं बोललं जात आहे. कारण निर्यात शुल्कामुळं कांदा बाहेरच्या ठिकाणी निर्यात करणं अडचणीचं होत आहे. त्यामुळं लवकरात लवकर कांद्यावर लावण्यातच आलेलं निर्यात शुल्क हटवण्यात यावं अशी मागणी शेतकऱ्यांसह विविध शेतकरी संघटना करत आहेत.

# चवळीचे लागवड तंत्र

महाराष्ट्रात चवळी मिश्र पीक म्हणून घेतळे जाते तर काही ठिकाणी पट्टे पध्दतीने लागवड केली जाते. अलिकडे मोठ्या शहरांच्या जवळपास भाजीच्या चवळीची ळागवड व्यापारीदृष्ट्या केली जाते. उन्हाळी पिकाची लागवड जानेवारी- मार्च तर खरीप हंगामात जून- जुलै महिन्यात करतात. तसेच बागायती पीक म्हणून हे पीक घेता येते. प्रकार : सर्वसाधारणपणे चवळीचे तीन प्रकार आढळून येतात : १) लांब शेंगांची चवळी : यालाच बाली किंवा यार्डबीन म्हणतात, झाडे वेलीसारखी वाढतात. शेंगांची लांबी ३० ते ९० सें.मी. पर्यंत असते. २) गोल शेंगाची चवळी : या प्रकारात शेंगांची लांबी ७ ते १२ सें.मी. पर्यंत असते. बिया आकाराने लहान असतात. ३) सर्वसाधारण चवळी : ही झाडे बुटकी ते मध्यम आकाराची असतात. काही जाती वेलीसारख्या वाढतात. जमीन : चवळी लागवडीपूर्वी जमीन नांगरून, कुळवून भुसभुशीत करावी व त्यात हेक्टरी १५ ते २० टन शेणखत मिसळावे. त्यानंतर सोयीनुसार वाफे किंवा सर्या पाडाव्यात व बी टाकावे. दोन ओळीतील अंतर ४५ ते ६० सें. मी. ठेवावे आणि विरळणी करून दोन रोपात २० ते ३० सें. मी. अंतर ठेवावे. हेक्टरी १५ ते २० किलो बी लागते.



सुधारित जाती : १) कोकण सफेद : ही जात ७५ ते ८० दिवसात येणारी असून तिला हिरबी गार पालवी व पांढर्या रंगाची फुले येतात. शेंगा खालच्या अर्धा भागापर्यंत लागतात. ही जात विषाणूजन्य रोगास प्रतिकारक आहे. या जातीपासून १४ क्विंटलपर्यंत हेक्टरी उत्पादन मिळते. २) कोकण सदाबहार : ही जात बुटकी असून लबकर तयार होते. शेंगा व पाने हिरव्या रंगाची असून लवकर येणारी उपयुक्त जात आहे. या जातीपासून १३ ते १४ क्विंटलपर्यंत उत्पादन मिळते. ३) पुसा-दो-फसली : ही जात उन्हाळी ब पाबसाळी या दोन्ही हंगामात घेता येते. झाडे झुडूपबजा वाढणारी असून शेंगाची लांबी १८ ते २० से.मी. पर्यंत असते. या जातीपासून ८० ते १०० क्विंटलपर्यंत उत्पादन मिळते. ४) अको गरीमा : या जातीच्या शेंगांची लांबी २० ते २५ सें.मी. असून जाडी इतर चवळीच्या प्रचलित जातीच्या शेंगांपेक्षा जास्त असते. शेंगेत गराचे प्रमाण जास्त असल्याने भाजीसाठी ती जात उत्तम आहे. हेक्टरी १२० ते १५० क्विंटलपर्यंत उत्पादन मिळते. ५) पुसा कोमल : या जातीच्या शेंगांची लांबी २० ते २२ सें.मी. पर्यंत असून, रंग हिरवा असतो. दाणा पांढरा, गोळ, लांबट आणि जाडा असल्याने उसळीसाठी ही जात चांगली आहे. शेंगांचे हेक्टरी उत्पादन १०० ते ११० क्विटलपर्यंत मिळते. ६) पुसा फाल्गुनी : शेंगा गडद -हिरव्या रंगाच्या १२ ते १५ सें.मी. लांब असतात. लागवडीपासून ६० दिवसात शेंगा काढणीस तयार होतात. हेक्टरी ८० ते ९० क्विंटलपर्यंत उत्पादन मिळते. ७) पुसा बरसाती : ही जात खरीप हंगामासाठी उपयुक्त आहे. शेंगेची लांबी २० ते २५ सें.मी. पर्यंत असते. ही जात लागवडीपासून ४५ दिवसात काढणीला तयार होते. हेक्टरी ७५ ते ८० क्विंटलपर्यंत उत्पादन मिळते.

# अंजीराची शेती कशी करावी, किती उत्पन्न मिळेल

भारतात अंजीर पिकवणे शेतकऱ्यांसाठी खरोखरच महत्त्वाचे आहे कारण ते विकून भरपूर पैसे कमवू शकतात. अंजीर देखील आपल्यासाठी खरोखर चांगले आहे आणि आपल्याला निरोगी ठेवण्यास मदत करू शकते. अंजीरमध्ये जीवनसत्त्वे आणि फायबरसारख्या अनेक चांगल्या गोष्टी असतात. आपण ते ताजे किंवा वाळलेले खाऊ शकता. औषध बनवण्यासाठीही त्यांचा वापर करतात. अंजीर उगवणारे महाराष्ट्र हे भारतातील अव्वल राज्य आहे. महाराष्ट्रात ते व्यवसाय म्हणून घेतले जाते. तामिळनाडू, कर्नाटक, गुजरात आणि उत्तर प्रदेशच्या काही भागांमध्ये देखील ते घेतले जाते. अंजीराच्या अनेक जाती विकसित केल्या आहेत. काही चांगल्या जाती खालीलप्रमाणे आहेत, पंजाब अंजीर, पुणे अंजीर, मार्शलीस अंजीर, पुणेरी अंजीर. अंजीर वाढवण्यासाठी, तुम्हाला उबदार, कोरडे हवामान आणि चांगली माती असलेली जागा आवश्यक आहे जी खूप ओली नाही. मातीमध्ये विशिष्ट प्रमाणात आंबटपणा असणे आवश्यक आहे आणि त्यातून पाणी सहजपणे वाहून गेले पाहिजे. अंजीरांना चांगली वाढ होण्यासाठी आणि भरपूर फळे येण्यासाठी २५ ते ३५ अंश तापमानाची आवश्यकता असते.

फील्ड तयारी : अंजीर पिकवण्यासाठी मोकळी माती लागते. सर्व प्रथम, रोपाचे जुने भाग विशेष मशीनने काढून शेत स्वच्छ करा. नंतर, माती फोडण्यासाठी आणि मोकळी करण्यासाठी दुसरे मशीन वापरा. यानंतर, शेत गुळगुळीत करून सपाट करा. यानंतर, जमिनीत सुमारे ५ मीटर अंतरावर खड्डा खणणे. शेवटी या खड्ड्यांमध्ये अंजिराची झाडे लावा आणि त्यांना थोडे पाणी द्या.

पेरणी आणि बियाणे प्रमाण : अंजिराची झाडे हलवण्याची उत्तम वेळ म्हणजे जुलै



आणि ऑगस्टमध्ये पावसाळा. हे करण्यासाठी, आपण एकतर रोपे वाढवण्यासाठी स्वतःची जागा बनवू शकता किंवा त्यांची विक्री करणार्या स्टोअरमधून काही खरेदी करू शकता. प्रत्येक मोठ्या क्षेत्रासाठी आपल्याला सुमारे २५० रोपांची आवश्यकता असेल. झाडे एकमेकांपासून ५ मीटर अंतरावर ठेवण्याची खात्री करा.

वनस्पती सिंचन : जेव्हा आपण अंजीर पिकवतो तेव्हा आपल्याला हंगामानुसार वेगवेगळ्या वेळी पाणी द्यावे लागते. जर आपण त्यांना पावसाळ्यात लावले, जे सहसा जुलै आणि ऑगस्टमध्ये असते, तर आपल्याला त्यांना पावसापासून जितके पाणी मिळते तितके पाणी द्यावे लागत नाही. हिवाळ्यात दर १४ ते २० दिवसांनी पाणी द्यावे लागते. उन्हाळ्यात, अंजीरच्या झाडांना भरपूर पाणी लागते, म्हणून आपल्याला आठवड्यातून दोनदा पाणी द्यावे लागते. पावसाळ्यात आपल्याला त्यांना पाणी द्यावे लागत नाही, परंतु जर पुरेसा पाऊस पडला नाही तर आवश्यकतेनुसार पाणी द्यावे लागते.वनस्पती काळजी : जर तुम्हाला तुमच्या अंजिराच्या झाडांना जास्त फळे द्यायची असतील तर तुम्हाला त्यांची चांगली काळजी घ्यावी लागेल. एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे जमिनीत रोपे लावल्यानंतर वर्षभरात रोपांची छाटणी करणे. जेव्हा तुम्ही झाडे कापता तेव्हा त्यावर एक मीटर उंचीपर्यंत नवीन फांद्या वाढणार नाहीत याची खात्री करा. तसेच, कोणत्याही लांब फांद्या कापून टाका. हे रोपाला नवीन शाखा वाढण्यास आणि निरोगी होण्यास मदत करेल, ज्यामुळे त्याला अधिक फळे येण्यास मदत होईल. प्रत्येक उन्हाळ्यात तुमची अंजीर फळे येईपर्यंत छाटून टाकावीत.

## दिन विशेष

### जागतिक दिवस: राष्ट्रीय गणित दिवस : सूर्याच्या उत्तरायणास प्रारंभ : उत्तर गोलार्धात वर्षातील सर्वात छोटा दिवस

### महत्वाच्या घटना

१२४१ : ला मंगोल चे प्रमुख बहादुर तैर हुलागु खान यांनी लाहोर ला ताब्यात घेतले.
१८४३ : लारवींद्रनाथ टागोरयांचे वडील देवेंद्रनाथ टागोर यांनी ब्रह्म समाज स्वीकारला होता.
१८५१ : जगातील पहिली मालगाडी रुरकी येथे सुरु करण्यात आली.
१८८२ : थॉमस एडिसन यांनी शोध लावलेल्या लाईट्स चा वापर करून पहिले लाईट्स चे क्रिसमस ट्री सजविल्या गेले.
१८८५ : सामुराई इटो हिरोबुमी जपानचे पहिले पंतप्रधान झाले.
१९१० : अमेरिकेत पहिल्यांदा डाक बचत प्रमाणपत्र जरी केल्या गेले.
१९२१ : भारतातील विश्वभारती विद्यापीठ सुरु झाले.
१९३७ : न्यूयॉर्क मधील ''द लिंकन'' या टनलला वाहतुकीसाठी उघडल्या गेले.
१९४० : मानवेंद्र नाथ राय यांनी रॅडिकल डेमोक्रॅटिक पार्टीची स्थापना केली.
१९४७ : इटली च्या संसदेने नवीन संविधान स्वीकारले.
१९६६ : जवाहरलाल नेहरूविद्यापीठाची स्थापना भारतीय संसद द्वारे केल्या गेली.
१९७१ : भारतीय अर्थशास्त्रज्ञ आणि शैक्षणिक अजिंक्य पाटील यांचा जन्म.
१९७१ : सोवियत संघाने जमिनीखाली अणुबॉम्ब ची चाचणी केली होती.
१९७८ : थायलंड नेसंविधानालास्वीकार केले.
१९९५ : प्रसिद्ध रंगकर्मी के. एन. पणीक्कर यांना मध्य प्रदेश सरकारचा 'कालिदास सन्मान' जाहीर
२०१० : अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा यांनी समलैंगिकतेच्या कायद्यावर आपली स्वाक्षरी केली.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१६६६ : गुरू गोविंद सिंग शिखांचे १० वे गुरू (मृत्यू: ७ आक्टोबर १७०८)
१८५३ : भारतीय तत्त्वज्ञ सरदादेवी यांचा जन्म. (मृत्यू: २१ जुलै १९२०)
१८८७ : श्रीनिवास रामानुजन थोर भारतीय गणिती. 'पार्टिशन फंक्शन'च्या रचनेवर त्यांनी मूलभूत संशोधन केले. (मृत्यू: २६ एप्रिल १९२०)
१९२९ : भारतीय-पाकिस्तानी क्रिकेटर वझीर मोहम्मद यांचा जन्म.
१९४७ : भारतीय क्रिकेटपटू दिलीप दोषी यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८५८ : भारताचे प्रसिद्ध क्रांतिकारक तारकनाथ दास यांचे निधन.
१९४५ : श्रीधर कृष्णाजी कुलकर्णी तथा 'पठ्ठे बापूराव' रसाळ लावण्या लिहीणारे लावणीसम्राट (जन्म: ११ नोव्हेंबर १८६६)
१९७५ : पेडर रोडवरील टोपीवाला देसाई यांच्या निवासस्थानात लिफ्टमधून खाली उतरत असताना लिफ्ट नादुरुस्त झाल्याने संगीतकार वसंत देसाई यांचा मृत्यू झाला. 'राम जोशी', 'अमर भूपाळी', 'दो आँखे बारह हाथ', 'झनक झनक पायल बाजे', 'गुँज उठी शहनाई' आदी गाजलेल्या चित्रपटांचे संगीत दिग्दर्शन त्यांनी केले. (जन्म: ९ जून १९१२)
१९८९ : सॅम्युअल बेकेट आयरिश लेखक, नाटककार, कवी आणि दिग्दर्शक (जन्म: १३ एप्रिल १९०६)
१९९६ : रामकृष्ण धोंडो तथा तात्या बाक्रे संगीत समीक्षक व पत्रकार
२००२ : दिलीप कुळकर्णी प्रायोगिक व व्यावसायिक रंगभूमीवरील चतुरस्त्र अभिनेते
२०११ : वसंत रांजणे मध्यमगती गोलंदाज (जन्म: २२ जुलै १९३७)

# जैविक पद्धतीने करा पिकांवरील किडी आणि रोगांचे नियंत्रण

जैविक कीड नियंत्रणाच्या पद्धतीत वेगवेगळे जीवाणू, बुरशी आणि विषाणूंचा वापर करून कीड नियंत्रण केले जाते. साथीचे रोग पसरवणाऱ्या या सूक्ष्म जीवजंतूंचे प्रयोगशाळेत मोठ्या प्रमाणावर उत्पादन करून त्यापासून रोगजंतूयुक्त जैविक कीड-रोगनाशके तयार केली जातात आणि त्याचा शेतात वापर केला जातो.

जीवाणू : बॅसिलस थुरीनजेन्सीस (बीटी) - या जीवाणूंचा उपयोग पतंगवर्गीय किडी उदा. कापसावील बोंडअळी, घाटेअळी, कोबीवरील चौकोनी ठिपक्याचा पतंग, पाने गुंडाळणारी अळी, तंबाखूवरील अळी इत्यादीच्या नियंत्रणासाठी होतो. भाजीपाला, नगदी पिके, फळझाडे, फुलझाडे इ. पिकांमध्ये वापर करता येतो. प्रमाण: ०.८ ते १ किलो/एकर फवारणीसाठी वापरावे

स्युडोमोनास फ्ल्युरोसंस - याचा उपयोग सर्व पिकांवरील बुरशीजन्य व जीवाणूजन्य कुज, मूळकुज, फळकुज, पानांवरील ठिपके इ. रोगांच्या नियंत्रणासाठी होतो. डाळींबावारील नुकसानकारक तेलकट डाग रोगाच्या नियंत्रणासाठी हा जीवाणू अत्यंत उपयुक्त आहे. प्रमाण: १० ग्रॅम/किलो बियाणे (बीज प्रक्रियेसाठी), २५ ग्रॅम/१० लिटर (फवारणीसाठी) किंवा ४ किलो/एकर जमिनीमधून फवारणीसाठी ०.५ ते १ किलो स्युडोमोनास पावडर ५ लिटर पाण्यात मिसळून घ्यावी. हे द्रावण गाळून घेतल्यानंतर ४० मिली स्टीकर/स्प्रेडर मिसळावे. हे द्रावण १९५



लिटर पाण्यात मिसळून प्रति एकर क्षेत्रावर वापरावे. जमिनीतून वापरासाठी २ किलो स्युडोमोनास शेणखतात मिसळून जमिनीत द्यावे. रोगाचा प्रादुर्भाव दिसताच ८ ते १० दिवसांच्या अंतराने फवारणी करावी. जमिनीत देताना वर्षातून किमान २ वेळा (३ महिने अंतराने) द्यावे. बुरशी - बुरशीची लागण झाल्यास सुरुवातीला किटकाच्या त्वचेवर लहानसा ठिपका दिसतो. रोगबाधीत कीटक बैचेन होऊन हालचाल मंदावते. मरण पावलेले कीटक कडक होतात. किटकाच्या बाह्य शरीरावरदेखील बुरशीची वाढ होते.

व्हर्टीसिलीयम लेकॅनी - ही बुरशी रस शोषक किडी उदा. मावा, तुडतुडे, फुलकिडे, पांढरी माशी, लाल कोळी, पिठ्या ढेकूण व खवले कीड या मृदू शरीरवर्गीय किडींच्या नियंत्रणासाठी उपयुक्त आहे. फळझाडांवरील पिठ्या ढेकूण व उसावरील लोकरी मावा, पांढरी माशीच्या जैविक नियंत्रणासाठी ही एक प्रभावी बुरशी आहे. प्रमाण: ५ ग्रॅम/लिटर पाणी किंवा ०.८ ते १ किलो/एकर (फवारणीसाठी) १ किलो व्हर्टीसिलीयम लेकॅनी पावडर ५ लिटर पाण्यात मिसळून ४ ते ६ तास भिजवून नंतर वस्त्रगाळ करून घ्यावे. दुसऱ्या ५ लिटर कोमट पाण्यात मिसळून घ्यावे. थंड झाल्यास दोन्ही द्रावणे एकत्र करून ४० मिली स्टीकर/स्प्रेडर मिसळावे. सदर १० लिटर द्रावणात १९० लिटर पाण्यातून मिसळून प्रति एकर क्षेत्रावर फवारणीसाठी वापरावे. शेतात किडीचा प्रादुर्भाव दिसू लागताच पहिली फवारणी करावी. किडीचे प्रमाण कमी होईपर्यंत १० दिवसांच्या अंतराने २ ते ३ वेळा फवारणी करावी. या बुरशीच्या वाढीस ९० टक्के सापेक्ष आर्द्रता व २० ते २५ अंश सेल्सिअस तापमान उपयुक्त ठरते.

बिव्हेरिया बॅसियाना - ही बुरशी पतंगवर्गीय किडी, भुंगेरे, हुमणी, सोंडकिडे, पाने खाणारी अळी, पाने गुंडाळणारी अळी, घाटेअळी, केसाळ अळी, वाळवी इ.च्या नियंत्रणासाठी उपयोगी आहे. प्रमाण: ५ ग्रॅम/लिटर पाणी, ०.८ ते १ किलो एकरी (फवारणीसाठी) किंवा ८ किलो/एकरी (जमिनीतून)

मेटारायझीयम ॲनिसोप्ली - या बुरशीचा उपायोग पाने खाणारी अळी, पाने गुंडाळणारी अळी, घाटे अळी, केसाळ अळी, पायरीला, खोडकीड, हुमणी, वाळवी इ. तीनशे प्रकारच्या किडींच्या नियंत्रणासाठी होतो. प्रमाण: ५ ग्रॅम/लिटर पाणी, ०.८ ते १ किलो एकरी (फवारणीसाठी) किंवा ८ किलो/एकरी (जमिनीतून)

विषाणू : अळीच्या शरीरात विषाणूची लागण झाल्यास विषाणूची वाढ सुरु होते. विषाणूच्या वाढीसाठी लागणारे अन्नघटक उदा. प्रथिने हे अळीच्या शरीरातील पेशीतून शोषून घेतले जातात. कीटकाच्या शरीरातील सर्व पेशी नष्ट होतात. एचएएनपीव्ही - या विषाणूचा वापर घाटेअळी, शेंगा पोखरणारी अळी, फळे पोखरणारी अळी, कळी व बी खाणारी अळी, बोंडअळी इ.च्या नियंत्रणासाठी हरभरा, तूर, टोमॅटो, कापूस, सुर्यफुल इ. पिकामध्ये होतो. प्रमाण: हरभऱ्यावरील घाटेअळी, तुरीवरील शेंगा पोखरणाऱ्या अळीसाठी २०० मिली/एकर, टोमॅटोवरील फळे पोखरणाऱ्या अळी, सूर्यफुलाच्या फुल व बी खाणाऱ्या अळीच्या नियंत्रणासाठी १०० मिली/एकर, कपाशीवरील बोंडअळीच्या नियंत्रणासाठी २०० मिली/एकर एसएलएनपीव्ही - या विषाणूचा उपयोग पाने खाणारी अळीच्या (स्पोडोप्टेरा) नियंत्रणासाठी सोयाबीन, कापूस, एरंडी इ. पिकांमध्ये होतो. प्रमाण: सोयाबीन, कापूस, एरंडी इ. पिकामध्ये पाने खाणाऱ्या अळीच्या नियंत्रणासाठी १०० ते २०० मिली/एकर.

# जि.प.शाळेतील ट्रेनी शिक्षिकेची निवड नियमबाह्य

## योग्य उमेदवार निवडीसाठी धरणे आंदोलन

बीड। प्रतिनिधी

बीड तालुक्यातील च-हाटा येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेंतर्गत ट्रेनी शिक्षिकेची निवड प्रक्रिया चुकीच्या पद्धतीने शासनाचे नियम डावलून केली आहे. संबंधित प्रकरणात गटशिक्षणाधिकारी यांनी लेखी आदेश देऊनही नियुक्ती न दिल्याने श्रीमती पिंगळे निकिता बाळु यांचे नातेवाईक आणि सहकारी यांनी काल दि.२० शुक्रवार रोजी जिल्हा परिषद शाळेच्या आवारात धरणे आंदोलन सुरू केले होते. शिक्षणाधिकारी यांनी संबंधित आंदोलन प्रकरणी गटशिक्षणाधिकारी बीड यांना लेखी आदेश देऊनही दुपारपर्यंत कोणीही आंदोलनाची दखल घेतली नाही.आंदोलनकर्ते यांच्या विनंतीवरून सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी आंदोलन स्थळी भेट देऊन भगवान फुलारी ,शिक्षणाधिकारी ( प्राथमिक) जिल्हा परिषद बीड यांच्याशी फोनवरून संवाद साधल्यानंतर विस्तार अधिकारी उत्तमराव पवार यांनी आंदोलन स्थळी भेट देऊन संपूर्ण चौकशी करून मंगळवार पर्यंत अहवाल देण्याचे आश्वासन दिल्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले.



जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा च-हाटा येथे मुख्याध्यापिका परदेशी यांनी मला डावलुन नियमबाह्यपणे ईतर उमेदवाराची निवड केली.संबधित प्रकरणी गटशिक्षणाधिकारी खान यांना तक्रार केल्यानंतर त्यांनी चौकशी करून माझी शैक्षणिक पात्रता डीएड व एमएससीआयटी कागदपत्रे पाहुन माझी नियुक्ती करण्याचे आदेश देऊनही मुख्याध्यापिका परदेशी यांनी नियुक्ती केली नाही.शासनाच्या आदेशाप्रमाणे इन कॅमेरा निवड केली नाही तसेच उमेदवारांना एमएससीआयटी बंधनकारक असतानाही नियम डावलून ईतर उमेदवारांला नियुक्ती दिली. प्रशासनाने योग्य निर्णय घेऊन मला न्याय द्यावा अशी मागणी पिडीता निकिता पिंगळे यांनी सांगितले.

गटशिक्षणाधिकारी खान यांनी निकिता पिंगळे यांची बीड.डीएड.,एमएससीआयटी हि शैक्षणिक पात्रता पाहुन नियुक्ती करण्याचे लेखी आदेश मुख्याध्यापिका परदेशी यांना दिले.परंतु त्यांचे आदेश न पाळता परदेशी यांनी बीएससी असलेल्या व एमएससीआयटी पात्रता नसणा-या उमेदवाराची नियुक्ती करत शासकीय आदेशाचे उल्लंघन केले आहे.संबधित प्रकरणात मुख्याध्यापिकेवर कारवाई करण्यात यावी आणि योग्य उमेदवाराची निवड करण्यात यावी यासाठी धरणे आंदोलन सुरू केले होते.

दुपारपर्यंत शासनाचा प्रतिनिधी आंदोलन स्थळी न आल्याने आम्ही डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांना बोलावून घेतले. त्यांनी शिक्षणाधिकारी ( प्राथमिक) जिल्हा परिषद बीड भगवान फुलारी यांच्याशी फोनवरून संवाद साधल्यानंतर शिक्षण विस्तार अधिकारी उत्तमराव पवार यांनी आंदोलनस्थळी भेट देऊन मंगळवार पर्यंत चौकशी अहवाल देऊन दोषींवर कारवाई करण्यात येईल या आश्वासनानंतर आंदोलन मागे घेण्यात आले. मंगळवार पर्यंत दोषींवर कारवाई न झाल्यास शिक्षणाधिकारी यांच्या कार्यालयासमोर आंदोलनात आंदोलन करण्यात येईल. यावेळी आंदोलनात युनुस शेख,सुदाम तांदळे,संदिप उबाळे, मनोज उबाळे, बलभीम उबाळे, रमेश उबाळे, रणजित उबाळे, विलास उबाळे, राजेश उबाळे, विनोद उबाळे सहभागी होते. महाराष्ट्र राज्य युती सरकारने निवडणुकीच्या तोंडावर मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना राबवुन ट्रेनी शिक्षक , पंचायत समिती कार्यालय, जिल्हा परिषद कार्यालय, आरोग्य विभाग अशा अनेक शासकीय व संस्थेच्या जागेवर सहा महिन्यांकरीता काम करण्याची संधी दिली.परंतु बहुतांश ठिकाणी स्थानिक पुढाऱ्यांनी जवळच्या लोकांच्या नियुक्ती साठी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांवर दबाव आणून शासकीय आदेश डावलून मनमानी कारभार केल्यामुळे ख-या शैक्षणिक पात्रता असलेल्या उमेदवारांवर अन्याय झालेला आहे. असे मत डॉ.गणेश ढवळे यांनी व्यक्त केले.

# पत्रकार धमकीची मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांनी दखल घ्यावी

### बीड जिल्हाधिकारी कार्यालयातील धमकी देणाऱ्या अधिकाऱ्यावर कारवाई करा | वडवणीत पत्रकारांची तहसीलदारांमार्फत मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांना मागणी

वडवणी। प्रतिनिधी

बीड येथील दैनिक वास्तवचे संपादक जितेंद्र सिरसाट यांना बीड जिल्हाधिकारी कार्यालयातील एका अधिकाऱ्याने बातमी का टाकली या कारणाने धमकी दिली. एवढेच नाही तर उचलून नेण्याची भाषा केली. सदर अधिकाऱ्यावर कारवाई करण्यात यावी आणि बीड जिल्ह्यातील पत्रकारांना संरक्षण देण्यात यावे अशी मागणी वडवणी येथील पत्रकारांनी थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित दादा पवार यांच्याकडे केली आहे.

वडवणी येथील पत्रकारांनी वडवणीचे तहसीलदार कार्यालयात तहसीलदार विनायक दिवटे तसेच पोलीस ठाणे मार्फत मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांना मागणी केली आहे. त्यांनी निवेदनात म्हटले आहे की बीड येथील दैनिक वास्तवचे संपादक जितेंद्र सिरसाठ यांनी मागील पंचवीस वर्षाच्या पत्रकारितेच्या माध्यमातून शेतकरी, शेतमजुरांना न्याय मिळवून देण्याची भूमिका बजावली आहे. अत्यंत मनमिळावू स्वभावाचे असलेले जितेंद्र सिरसाट यांनी कधीही चुकीच्या बातम्या छापलेल्या नाहीत. लोकांना न्याय मिळवून देण्यासाठी त्यांनी कधी कधी अधिकाऱ्यांची नाराजी घेतलेली आहे. मात्र त्यांना या पद्धतीने धमकी देऊन आवाज दाबण्याचा प्रयत्न करणे हे चुकीचे आहे. वडवणी येथील पत्रकारांनी शनिवारी सकाळी निवेदन देऊन त्या ठिकाणी भावना व्यक्त केल्या. यावेळी पत्रकार अशोक निपटे यांनी बोलताना सांगितले की जितेंद्र सिरसाट हे अत्यंत सत्यवादी आणि न्यायप्रिय पत्रकार आहेत. त्यांच्यावर या पद्धतीने धमकी दिली जात असेल तर जिल्ह्यातील सर्वसामान्य पत्रकारांना पत्रकारिता करावी का नाही हा प्रश्न पडला आहे. यावेळी पत्रकार विनायक जाधव यांनी लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ असणाऱ्या पत्रकारांना धमकी देणाऱ्यावर कारवाईची मागणी केली. पत्रकार सतीश वाघमारे यांनी पत्रकार संरक्षण कायद्या अंतर्गत कारवाई करून सदर अधिकाऱ्याला निलंबित करावे अशी मागणी केली. धमकी देणाऱ्या अधिकाऱ्याला निलंबित करण्याची मागणी यावेळी नव युवक पत्रकार प्रकाश उजगरे यांनी केली. पत्रकार लहू खारगे यांनी अधिकाऱ्यांवर कडक कारवाईची मागणी केली तर प्राध्यापक श्रीनिवास काकडे यांनी पत्रकाराला उचलून नेण्याची भाषा करणाऱ्या महिला अधिकाऱ्याचा जाहीर निषेध व्यक्त करून निलंबनाची मागणी केली. यावेळी पत्रकार रामेश्वर गोंडे, भैय्यासाहेब तांगडे, सतीश वाघमारे, अशोक निपटे, विनायक जाधव, पत्रकार अशोक फपाळ, पत्रकार लहू खारगे, श्रीनिवास काकडे, अर्जुन मुंडे, जोतीराम कलेढोण, विनोद काकडे, प्रकाश उजगरे यांच्यासह भालेराव मित्र मंडळाचे जिल्हाध्यक्ष बाबासाहेब साळवे व त्यांचे कार्यकर्ते यांचीही उपस्थिती होती.



### अन्यथा वडवणी तहसीलवर मोर्चा काढू–साळवे

भ्रष्टाचार उघडा करणारे पत्रकार जितेंद्र सिरसाट यांना धमकी देणाऱ्या अधिकाऱ्यावर कडक कारवाई होणे गरजेचे आहे येत्या दोन दिवसात सदर अधिकाऱ्यांवर कडक कारवाई झाली नाही अथवा गुन्हे दाखल झाले नाहीत तर आम्ही भालेराव मित्र मंडळाच्या वतीने वडवणी तहसील कार्यालयावर निदर्शने करु व मोर्चा काढू असा इशारा भालेराव मित्र मंडळाचे जिल्हाध्यक्ष बाबासाहेब साळवे यांनी दिला.

# मंगलनाथ मल्टिस्टेटची दिनदर्शिका प्रकाशित

### चंद्रशेखर शिवाचार्य महाराज माजलगावकर यांच्या शुभ हस्ते झाले प्रकाशन

माजलगाव। प्रतिनिधी

येथील मंगलनाथ मल्टीस्टेटचे दिनदर्शिका प्रकाशन सोहळा दि २० डिसेंबर शुक्रवार रोजी संपन्न झाला. संस्थेचे श्रद्धास्थान लिंगैक्य प्रभू पंडिताराध्याय शिवाचार्य महाराज यांच्या प्रतिमेस विनम्र अभिवादन करून माजलगाव मिस्कीन स्वामी मठ संस्थान चे मठाधीपती श्री.ष.ब.१०८ चंद्रशेखर शिवाचार्य महाराज यांच्या शुभ हस्ते दिनदर्शिका २०२५ चे लोक प्रकाशन करण्यात आले.

याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष श्री आर.जी कानडे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले की, संस्थेला २५ वर्ष पूर्ण झाली आहेत.सभासदांना संस्थेच्या विविध योजनांची माहिती व्हावी व दिनदर्शिकेचा देखील लाभ सभासदांना घेता यावा करीता संस्था गेली २५ वर्षांपासून अखंडित परंपरागत दिनदर्शिकेचे प्रकाशन करत आहे.त्याच बरोबर सर्व सभासदांना सदरील दिनदर्शिका घरपोच दिली जाणार आहे. संस्थेचे श्रद्धास्थान लिंगैक्य प्रभू पंडिताराध्याय शिवाचार्य महाराज यांनी वचन,निष्ठा व समाजसेवा या घालून दिलेल्या तीन बंधननावरती संस्था कार्य करत असल्यामुळे संस्थेला आज यशस्वी २५ वर्ष पूर्ण झाली. त्यांचा आशीवार्द संस्थेच्या सदैव पाठीशी आहे. संस्थेचे आज रोजी ५५० कोटी पेक्षा अधिक व्यवसाय असून ३११ कोटी ठेवी व २३२ कोटी पेक्षा अधिक कर्ज वाटप आहे त्यामध्ये १२५ कोटी पेक्षा अधिक सुरक्षित सोनेतारण कर्ज वाटप आहे व एकूण कर्जाच्या ९९.०८ टक्के कर्ज हे सुरक्षित असल्यामुळे सभासदांच्या ठेवी या सुरक्षित आहेत. संस्थेने स्थापनेपासून केवळ व्यवसाय वाढ व अधिकाधिक नफा मिळवणे हे उद्दिष्ट न ठेवता सभासद सेवा व सभासदांच्या ठेवीना सुरक्षितता या बाबींना नेहमीच प्राधान्य दिले आहे यापुढे देखील संस्था सुरक्षिततेला प्राध्यान्य देऊनच काम करणार आहे असे आश्वासन दिले. याप्रसंगी संस्थेचे संचालक सुधाकर गुळवे,व्यवस्थापकीय संचालक अँड.रवींद्र कानडे संस्थेचे मुख्य सरव्यवस्थापक श्री भिसे दत्तात्रय, नारायण शेंडगे, व वरिष्ठ अधिकारी सचिन कैलासे, राहुल काटकर, अमोल पांडे, विकास पाटील इत्यादी उपस्थित होते.



# मराठी पत्रकार परिषद विभागीय सचिवांच्या नियुक्तया जाहीर

### संभाजीनगर विभागाच्या सचिवपदी रवी उबाळे

पुणे। प्रतिनिधी

मराठी पत्रकार परिषदेच्या कोअर कमिटीच्या काल पुण्यात झालेल्या बैठकीत परिषदेच्या विभागीय सचिवांच्या नियुक्तयांवर शिक्कामोर्तब करण्यात आले आहे.. विभागीय सचिवांच्या नियुक्तया करताना तरूणांना प्राधान्य देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.. एस.एम.देशमुख बैठकीच्या अध्यक्षस्थानी होते. बैठकीस विश्वस्त किरण नाईक, विश्वस्त शरद पाबळे, कार्याध्यक्ष शिवराज काटकर, सरचिटणीस सुरेश नाईकवाडे, डिजिटल मिडिया परिषदेचे राज्य अध्यक्ष अनिल वाघमारे, मावळते विभागीय सचिव गणेश मोकाशी उपस्थित होते.. प्रारंभी पिंपरी चिंचवड तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष अनिल वडघुले आणि टीमने परिषदेच्या पदाधिकारयांचे स्वागत केले..

मराठी पत्रकार परिषदेच्या संघटनात्मक रचनेत विभागीय सचिवांना विशेष महत्व आहे.. आपल्या विभागात संघटनेचं काम वाढविणयाबरोबरच विभागातील जिल्हे, तालुका पत्रकार संघांशी संपर्क आणि समन्वय ठेवण्याचं काम ही व्यवस्था करते..परिषदेच्या उपक्रमांची आपल्या विभागात अंमलबजावणी करण्याचं काम विभागीय सचिव पार पाडतात.. थोडक्यात विभागीय सचिव हे परिषदेचे कान व डोळे म्हणून कार्यरत असतात.



नवे विभागीय सचिव पुढील प्रमाणे : १) मुंबई विभाग : दीपक कैतके, मुंबई फेरनियुक्ती, २) पुणे विभाग : पी . पी. कुळकर्णी, सोलापूर, ३) संभाजीनगर विभाग : रवी उबाळे, बीड, ४) नागपूर विभाग : प्रदीप घुमडवार, नागपूर, ५) अमरावती विभाग : शिखरचंद हुकूमचंद बागरेचा, वाशिम, ६) कोकण विभाग : मनोज खांबे, महाड, ७) लातूर विभाग : सचिन शिवशेट्टे उदगीर, फेरनियुक्ती, ८) नाशिक विभाग : अमोल खरे, मनमाड, ९) कोल्हापूर विभाग :चंद्रकांत क्षीरसागर, सांगली.एस.एम.देशमुख यांनी सर्व नवनियुक्त विभागीय सचिवांचे अभिनंदन केलं आहे.

# भारताचा कम्युनिष्ट पक्ष मार्क्सवादी धारूर तालुक्याचे त्रैवार्षिक अधिवेशन

धारूर। प्रतिनिधी

भारताचा कम्युनिस्ट पक्ष मार्क्सवादी तालुका धारूर या पक्षाचे चवथे त्रैवार्षिक अधिवेशन नाथ महाराज मंदिर सभागृह धारूर येथे २० डिसेंबर २०२४ रोजी संपन्न झाले यावेळी पुढील तीन वर्षासाठी कॉ .डॉ. अशोक थोरात यांची तालुका सचिव म्हणून फेर निवड करण्यात आली .

भारताचा मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे ४ थे त्रैवार्षिक अधिवेशन दिनांक २० डिसेंबर २०२४ रोजी नाथ महाराज मंदिर सभागृह धारूर येथे उत्साहात संपन्न झाले .या अधिवेशनाचे सुरुवात ज्येष्ठ कॉ काशीराम शिरसट यांच्या हस्ते झेंडावंदन करून अधिवेशनाला सुरुवात करण्यात आली यावेळी अधिवेशनाचे उद्घाटक मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे जिल्हा सचिव कॉ.अ‍ॅड.अजय बुरांडे यांनी केले यावेळी उद्घाटना पर मार्गदर्शनाखाली सध्याची परिस्थिति व मार्क्सवादी कम्युनिष्ट पक्षापुढे आव्हाने यावर सविस्तर असे मार्गदर्शन केले यावेळी तालुका सचिव कॉ डॉ अशोक थोरात यांनी मागील तीन वर्षाचा लेखी अहवाल सर्वां समोर मांडून त्याच्यावर सविस्तर चर्चा करण्यात आली व तो लेखी अहवाल एक मताने मंजूर केला व पुढील तीन वर्षासाठी नवीन आठ सदस्यांची नविन कमिटी या मध्ये कॉ.काशिराम सिरसट , कॉ.डॉ.अशोक थोरात , कॉ. मोहन लांब , कॉ. अ‍ॅड संजय चोले , कॉ.मिरा शिंदे , कॉ .मधुकर चव्हाण , कॉ.दादा सिरसट , कॉ . लता खेपकर निवड करण्यात आली . आणि तालुका सचिव म्हणून कॉ. डॉ अशोक थोरात यांची तालुका सचिव पदी निवड करण्यात आली . या वेळी रुई धारूर येथील कॉ.शिवाजी गायकवाड भ्रष्टाचाराच्या विरोधात लढल्यामुळे पक्षाचे सचिव मंडळ सदस्य कॉ. दत्ता डाके यांच्या हाताने त्यांचा सत्कार करण्यात आला या अधिवेशनाचा समारोप कॉ. दत्ता डाके यांनी केला .



# अभ्यास करताना मूलभूत संकल्पना समजून घेणे आवश्यक आहे : सोफियान पटेल

बीड। प्रतिनिधी

युपीएससी भारतातील प्रशासकीय सेवतील अत्यंत महत्वपूर्ण अशी परीक्षा आहे तेवढीच अवघड सुद्धा. पण कसोशीने प्रयत्न केल्यास तुम्ही नक्कीच यात यश मिळवू शकता या साठी अभ्यास करताना मूलभूत संकल्पना समजून घेणे आवश्यक आहे. असे प्रतिपादन पटेल इन्स्टिट्यूट चे संचालक व यूपीएससी कोच सोफियान पटेल यांनी शहरातील अलहुदा उर्दू हायस्कूल बीड येथे वर्ग आठवी , नववी, दहावीच्या विद्यार्थी विद्यार्थिनींना मार्गदर्शन करताना केले. यावेळी मुख्याध्यापक डॉ सिराज खान आरजू व सर्व शिक्षकांनी सोफियान पटेल यांचे पुष्पगुच्छ व शाल घेऊन स्वागत केले.



सोफियान पटेल मार्गदर्शन करताना पुढे म्हणाले की च्या परीक्षेला बसण्यासाठी ची शैक्षणिक अहर्ता ही पदवी आहे. १० वी नंतर तुम्ही कुठल्याही क्षेत्रात जाऊन आपल्या आवडीप्रमाणे व सोयीप्रमाणे पदवीपर्यंतचे शिक्षण घेऊन वयाचे २१ व्या वर्षी या परीक्षेला बसू शकता. ज्या विद्यार्थ्यांनी हीच परीक्षा द्यायचे स्वप्न बनविले असल्यास, कला क्षेत्रातून पदवी केल्यास पदवी दरम्यान सुद्धा या परीक्षेचा अभ्यास करू शकतात, कारण कला क्षेत्रात असलेले विषय आणि या परीक्षेत सामान्य अध्ययन मध्ये असलेले विषय बघता, कला क्षेत्रातून अभ्यास केल्यास चा बेसिक अभ्यासाची पोचपावती नक्कीच मिळते. कला क्षेत्रातून पदवी केल्यास विद्यार्थ्यांना या परीक्षेच्या अभ्यासासाठी भरपूर वेळ मिळतो. पण जर तुम्हाला आवडणाऱ्या विषयात पदवी केली तरीही काही फरक पडणार नाही, फक्त आपापल्या सोयीप्रमाणे व वेळ काढून पदवी काळातच या परीक्षेचा अभ्यास केल्यास पुढे अभ्यासाचा वेळ नक्कीच वाचू शकतो. ही भारतातील प्रशासकीय सेवतील अत्यंत महत्वपूर्ण अशी परीक्षा आहे तेवढीच अवघड सुद्धा. पण कसोशीने प्रयत्न केल्यास तुम्ही नक्कीच यात यश मिळवू शकता. या वेळी शाळेतील शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी ,विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.


## जाहीर नोटीस

दिनांक : २१-१२-२०२४

तमाम जनतेस, वित्त संस्थांना, पतसंस्थांना, बँकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक भाग्यश्री भरतराव गायकवाड, कृष्णा भरतराव गायकवाड. धनश्री भरतराव गायकवाड हे आहेत. सदर मिळकत ही पुर्वीचे मालक भरत बजरंग गायकवाड यांनी खरेदीखत क्र.३२८/१९९५ दि.२३-०२-१९९५ रोजी खरेदी केलेली होती व सध्या ते हयात नाहीत व मालक म्हणून मिळकतीला वरील नमूद वारसांची नावे लागलेले आहेत. तथापी, वर नमूद नोंदणीकृत खरेदीखत क्र. ३२८/१९९५ दि.२३-०२-१९९५ या खरेदीखताची मुळ प्रत व मुळ नोंदणी पावती गहाळ झालेली असून, कृष्णा भरत गायकवाड यांनी पोलीस स्टेशन, पेठ बीड येथे सदर दस्त गहाळ झाले बाबत तक्रार दिली.

सदर मिळकती बाबत नोंदविलेले मुळ नोंदणीकृत खरेदीखत दस्त क्र.३२८/१९९५ दि.२३-०२-१९९५ व त्या सोबत असलेली मुळ नोंदणी पावती ही कागदपत्रे कोणत्याही बँकेत अथवा वित्तीय संस्थेत गहाण ठेवून कर्ज घेतलेले असल्यास अगर इतर कोणताही चालू वाद असल्यास संबंधितांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे आत खालील पत्त्यावर समक्ष लेखी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्रांच्या नकलासह कार्यालयात येऊन आमची खात्री करून द्यावी. मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास, ज्याचे काही हक्क, हितसंबंध आहेत, ते त्यांनी जाणिवपुर्वक सोडून दिले आहेत, असे समजण्यात येईल. मग कोणाच्याही कर्ज बोजाची अथवा इतर कुठल्याही हक्क हितसंबंधाची कसलीही तक्रार चालणार नाही, याची नोंद घ्यावी,

परिशिष्ट मिळकतीचे वर्णन : डि ।। बीड सब डि. ।। बीड पैकी बीड जिल्हा परिषद, बीड हद्दीतील मा. दुय्यम निबंधक साहेब, बीड यांचे कार्यक्षेत्रातील नगर परिषद मालमत्ता क्र.३-९-२५८ (नवा). शहर भुमापन क्र.४४८१, क्षेत्रफळ १२०० चौ. फुट, आंबेडकर चौक, पेठ बीड, ता. जि. बीड, ज्याची चतुः सिमाः- पुर्वेस : हिरामणसिंग बुंदेले यांचे घर, पश्चिमेस : दर्गा पीर व सरकारी रस्ता, दक्षिणेस : बन्सी शंकर व सुरेश शंकर यांच्या मालकीची ६.५ फुटाची गल्ली, उत्तरेस : अंबादास पवार व हिरामण संपत यांची जागा

सदर मिळकतीचे विद्यमान मालक : भाग्यश्री भरतराव गायकवाड, कृष्णा भरतराव गायकवाड, धनश्री भरतराव गायकवाड, सर्व रा.बीड, ता.जि. बीड

मार्फत
**अ‍ॅड. एस.आर.राजपुत, बीड**
मो.नं. ९४२१३४५३४६

जाहीर नोटीस देणार
**कृष्णा भरत गायकवाड**
रा. आंबेडकर चौक, बीड
मो.नं. ८६९८७५७७७५

**मा.श्री. ओ.एन. मंत्री साहेब, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज १५४०/२०२४, अ‍ॅड. एन. के. शिरसाट**

**श्रीमंत पि. ज्ञानोबा सानप व ईतर विरूध्द निरंक**

अर्जदार : १. श्रीमंत पि. ज्ञानोबा सानप, वय ६० वर्षे, धंदा शेती, रा.सानपवाडी, ता.जि. बीड, २. रामराव पि. ज्ञानोबा सानप, वय ५८ वर्षे, धंदा शेती, रा.सानपवाडी, ता.जि. बीड, ३ गयाबाई भ्र. अश्रुबा घोळवे, वय ६१ वर्षे, धंदा घरकाम, रा. सारणी सांगवी, ता. केज, जि. बीड, ४. सुमित्रा भ्र. भागवत घुले, वय ५५ वर्षे, धंदा घरकाम, रा. केळगांव, मारूती मंदीर, केज ता. केज, जि. बीड

विरुध्द निरंक

मागणी- बॉम्बे रेग्युलेशन अ‍ॅक्ट. १८२७ कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत. वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत ज्ञानोबा पि. तुकाराम सानप, यांचा मृत्यु झाला, यांचे वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. ज्याअर्थी मयत ज्ञानोबा पि. तुकाराम सानप, यांचा मृत्यु दिनांक ०३/०५/२०१९ रोजी झाला आहे. यांचा मृत्यु वरील अर्जदारा व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. मयत मयत ज्ञानोबा पि. तुकाराम सानप, यांच्या मृत्युनंतर वरील अर्जदारांना शासकीय व निमशासकीय कामासाठी सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्यांचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयत मयत ज्ञानोबा पि. तुकाराम सानप, यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ११/११/२०२४ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्कयाने दिले.

सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. ०४/१२/२०२४ आहे.

स्वाक्षरित
**क. लिपीक**

आदेशावरून
स्वाक्षरित
**अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय व स्तर, बीड**

**जाहीर प्रगटन**

**मा. श्रीमती टी. ए. आसरकर ३ रे सह दिवाणी न्यायाधीश क स्तर बीड यांच्या न्यायालयात,**

**किरकोळ दिवाणी अर्ज १७९३/२०२४, अ‍ॅड. एम. आर. गर्जे**

**राजेश्वर व ईतर विरुध्द निरंक**

अर्जदार : १) राजेश्वर पांडुरंगराव जाधव, वय ४७ वर्ष धंदा व्यापार पत्ता- नवजीवन शिक्षक कॉलनी, शाहुनगर, बीड ता.जि.बीड, (२) महेश्वर पांडुरंगराव जाधव, वय ४७ वर्ष धंदा व्यापार नवजीवन शिक्षक कॉलनी, शाहुनगर, बीड ता. जि. बीड, (३) ज्ञानेश्वर पांडुरंगराव जाधव, वय ४५ वर्ष धंदा नोकरी नवजीवन शिक्षक कॉलनी, शाहूनगर, 'बीड ता. जि.बीड

विरुध्द

मागणी अर्ज:- बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत, वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत विजयालक्ष्मी उर्फ गंगाबाई पांडुरंग जाधव यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे. त्याअर्थी मयत विजयालक्ष्मी उर्फ गंगाबाई पांडुरंग जाधव यांचा मृत्यु दि. ०४/११/२०२४ रोजी पाटोदा ता पाटोदा जि. बीड येथे झाला आहे. अर्जदार क्र १ ते ३ हे मयताचे मुले आहेत. या व्यतीरिक्त मयतास इतर कोणीही वारस नाहीत वरील अर्जदारास शासकीय व निमशासकीय कामाकरीता व इतर कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे, त्याअर्थी सर्व जनतेस फळविण्यात येते की, सदरहु अर्जदार व गैरअर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्यांचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरह कोर्ट सदहू अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयत विजयालक्ष्मी उर्फ गंगाबाई पांडुरंग जाधव यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोद घ्यावी. आज दिनांक १७ माहे डिसेंबर २०१४ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले. सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. ३१ जानेवारी २०२५.

स्वाक्षरित
**क. लिपीक**

आदेशावरून
स्वाक्षरित
**अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय, व. स्तर, बीड,**


# पाटोदा येथील जय भवानी महाविद्यालयात एड्स जनजागृती



पाटोदा। प्रतिनिधी

जय भवानी महाविद्यालयात एड्स जनजागृती अभियानाचे आयोजन पाटोदा येथील जय भवानी कला व विज्ञान महाविद्यालय पाटोदा राष्ट्रीय सेवा योजना विभाग व एड्स नियंत्रण कक्ष शासकीय रुग्णालय बीड व रेड रिबन क्लबच्या वतीने महाविद्यालयात जनजागृती अभियानाचे आयोजन करण्यात आले या अभियानाचे उद्घाटन जागतिक एड्स दिनानिमित्त करण्यात आले या अभियानात जनजागृती रॅली निबंध स्पर्धा व्याख्यान पटकथा एड्स केंद्रास स्वयंसेवकाच्या भेटी इत्यादी कार्यक्रमाची आयोजन करण्यात आले जागृती करण्यासाठी प्रश्न मंजुषा व पाटोदा शहरातील कॉलेज महाविद्यालय शाळा मध्ये जनजागृती करण्यात आली पाटोदा शहरातील सार्वजनिक ठिकाणी एड्स रोगाविषेक माहिती देऊन जनजागृती करण्यात आली या उपक्रमात महाविद्यालयाची प्राचार्य प्राध्यापक सोमनाथ घाडगे सर यांनी सहकार्य केले तर राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रमाधिकारी म्हणून प्राध्यापक शिवाजीराव काकडे प्राध्यापक डॉक्टर लोखंडे सर प्राध्यापक रकटे मॅडम महाविद्यालयातील प्राध्यापक स्वयंसेवक विद्यार्थी विद्यार्थिनी यांनी परिश्रम घेतले वेगवेगळ्या स्पर्धात सहभागी विद्यार्थ्यांना राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे वतीने पारितोषिक प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला प्राचार्य डॉक्टर विश्वास कदम यांच्या मार्गदर्शनाखाली हे अभियान यशस्वी करण्यात आले या अभियानात बीड जिल्हा नियंत्रण कक्षाचे श्री सुहास कुलकर्णी गोरे मॅडम यांनी सहकार्य केले

# स्वत:च्या आरोग्यासाठी वेळ द्या-माजी आ.लक्ष्मण पवार

## हृदयविकाराकडे दूर्लक्ष करू नका, काळजी घ्या-डॉ. सुनिल बोबडे यांचे हृदय रोगावर अमूल्य मार्गदर्शन

**गेवराई । प्रतिनिधी**

रोजच्या धावपळीत आयुष्याकडे दूर्लक्ष झाल आहे. त्यामुळे, आजाराचा आलेख उंचावत चालला आहे. काळजी करण्याची गरज असून, नागरीकांनी निरोगी आरोग्यासाठी स्वतःची काळजी घेतलीच पाहिजे. हृदय विकाराच्या वाढत्या घटना काळजीत टाकणाऱ्या असून, वेळीच लक्ष देण्याची गरज असल्याचे प्रतिपादन हृदय रोग तज्ज्ञ डॉ. सुनिल बोबडे यांनी येथे बोलताना केले आहे. शनिवार ता. २१ डिसेंबर रोजी युवा नेते बाळराजे पवार यांच्या वाढदिवसानिमित्त गेवराई शहरातील नगर परिषदेच्या छत्रपती शिवाजीमहाराज शॉपिंग सेंटर सभागृहात महा आरोग्य शिबीराचे आयोजित करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते.

व्यासपीठावर माजी आमदार लक्ष्मण पवार, उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ.सुरज कोठावळे, डॉक्टर राजेश शिंदे, डॉक्टर सराफ, शिवराज पवार, नगराध्यक्ष सुशील जवंजाळ, डॉ.धनजय माने, डॉ.दिपक फाटक,डॉ.आनंद मोटे,डॉ. विशाल पवार, डॉ.प्रशांत गायकवाड यांची उपस्थिती होती. दरम्यान, दैनंदिन जीवनात भाजीपाला आणि हलक्या आहाराचा उपयोग करून, तळलेले, तेलकट आणि मेदयुक्त पदार्थ टाळायचा प्रयत्न करा, असे आवाहन ही त्यांनी यावेळी केले आहे. दरम्यान, वय वाढल्यावर आपल्या आरोग्याची काळजी नागरिकांनी घ्यायलाच हवी. व्याधी सुरू झाल्यानंतर, पश्चाताप करण्यात काय अर्थ आहे. अपरिहार्यता म्हणून, आपल्याला रासायनिक युक्त अन्नधान्य खावे लागते. त्यामुळे, प्रत्येक नागरिकांनी स्वतःसाठी एक दोन गुंठे किंवा परसबागेत पालेभाज्या लावून, आरोग्याची काळजी घ्यावी, असे आवाहन माजी आमदार लक्ष्मण पवार यांनी केले. पवार यांनी स्व- अनुभव विशद करून, हृदय विकाराचा त्रास होऊ नये, या संदर्भात काय काळजी घ्यावी, या विषयी महत्त्वपूर्ण गोष्टी सांगून, आरोग्यमय



गेवराई शहरातील महाआरोग्य शिबीरात उत्स्फूर्त प्रतिसाद

धनसंपदा असल्याचा उल्लेख केला. ज्येष्ठ पत्रकार सुभाष सुतार यांनी ही हृदय विकाराचा सामना कसा केला. या विषयी मार्गदर्शन करून, स्व अनुभव विशद केला. यावेळी डॉ. सुनिल बोबडे यांनी हृदयविकाराची लक्षणे आणि उपाय या विषयी सविस्तर माहिती दिली. ते म्हणाले, ॲटॅक म्हणजे, हृदयावर हामला. रक्त पुरवठा कमी झाला की, ॲटॅक येण्याचा धोका वाढतो. ताणतणाव, चिडचिड होणे, अती राग ,अवेळी खानपान, तेलकट, मेदयुक्त पदार्थांचे सेवन, उशिरा झोप इ. कारणाने हृदय विकाराचा संभव असतो. अलीकडच्या काळात ६३% लोकांना हृदय रोगाचा त्रास सहन करावा लागतो. मात्र, केवळ ५३% लोक तत्परता दाखवत नाहीत, ही गंभीर बाब असून, सरकारी, खाजगी रुग्णालयात उपचार घेऊन, रूग्ण बरा होतो. याकडे त्यांनी लक्ष वेधले.हृदय विकारात प्रचंड वेदना होतात. ९०% छातीत दुखते,१०% लोकांना पाठित, डाव्या हातात त्रास जाणवतो. मात्र, आपल्याला जळजळ झाल्याने त्रास होत असेल, या दृष्टिकोनातून त्याकडे दुर्लक्ष केले जाते. हे अतिशय चुकीचे असल्याचे त्यांनी सांगितले. हृदय रोग, मधुमेह टाळता येतो. अनुवंशिक आजाराचा इतिहास असेल तर, किमान असे आजार कंट्रोल ठेवता येतात, असे निरिक्षण डॉ. बोबडे यांनी नोंदवून, अचानक त्रास जाणवला की, घाबरू नका ; कुणाची तरी मदत घ्या. शांत पडून रहा, चालू नका, गडबड करू नका, असा मौलिक सल्ला ही त्यांनी दिला. वेळेत वैद्यकीय तपासण्या करा, आपल्याकडे सुविधा उपलब्ध आहेत. त्याचा फायदा घ्या, असे आवाहन करून, बीड शहरात आपल्या हक्काचा मेडिकेअर नावाचा दवाखाना रुग्ण सेवेसाठी सदैव तत्पर असणार आहे. गेल्या दीड - दोन वर्षांपासून बांधिलकी जोपासून आम्ही करत आहोत. शासन स्तरावर असलेली सुविधा उपलब्ध करून दिली जाते. त्यामुळे, गेवराईकरांनी हक्काने यावे, असे कृतज्ञतापूर्वक आवाहन डॉक्टर बोबडे यांनी शेवटी बोलताना केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नगरसेवक संजय इंगळे यांनी केले. आभार ॲड. भगवान घुंबार्डे यांनी मानले.बाळराजे पवार मित्र मंडळाच्या वतीने पार पडलेल्या महा शिबीरात मधुमेह , रक्तदाब, हृदयरोग, ई.सि.जी. करण्यात आली. या शिबीरात नागरिकांनी रक्तदान करून सहभाग नोंदवून शिबीराचा लाभ घेतला. सदरील शिबीर यशस्वी करण्यासाठी राजेंद्र राक्षसभुवनकर, भगवान घुबार्डे, राहुल खंडागळे, दादासाहेब गिरी, ब्रम्हदेव धुरंधरे, याहीया खॉन, राम पवार, संजय इगळे, मुन्नासेठ,कृष्णा काकडे,राजाभाऊ आर्दड, धम्मपाल सौंदरमल, भरत गायकवाड, सय्यद बद्दोदिन,छगन आप्पा हादगुले, किशोर धोडलकर, अरुण मस्के, जानमहमंद बागवान, आप्पासाहेब कानगुडे, जुनेद बागवान, इम्रान पठाण,सय्यद हासन, यांनी प्रयत्न केले.

# दिंद्रुड येथे कुठल्याही परिस्थितीत बंद पुकारण्यात येणार नाही

**दिंद्रुड । प्रतिनिधी**

**वेगवेगळ्या कारणांमुळे पुकारण्यात येणाऱ्या सततच्या बंदला दिंद्रूडकर व व्यापारी पुरते वैतागले आहेत. यामुळे सर्व व्यापाऱ्यांनी एकत्रित येऊन बैठक घेतली. यापुढे काहीही झाले तरी कुठल्याही परिस्थितीत बंद पुकारण्यात आला तरी आपापली दुकाने चालू ठेवण्याचा एकमुखी निर्णय सर्वानुमते घेण्यात आला.**

माजलगाव तालुक्यातील दिंद्रूड ही सर्वात मोठी बाजारपेठ आहे. व्यावसायिक दृष्ट्या अतिशय झपाट्याने वाढत असलेल्या मार्केटला बाहेरील व्यापारीवर्ग व्यापारासाठी पहिली पसंती देतात. भुसार, कृषी उत्पादने, बांधकाम साहित्या पासून ते सोन्याचांदीची खरेदी - विक्री मोठ्या प्रमाणात होत असल्यामुळे दररोज लाखोंची उलाढाल होते. इथला शेकडो वर्षांपासून भरणारा आठवडी बाजार पंचक्रोशीत


बंदला वैतागलेल्या व्यापाऱ्यांचा एकमुखी ठराव

लोकप्रिय आहे.

मागच्या काही वर्षांपासून कोणत्या ना कोणत्या कारणाने सतत होणाऱ्या बंद मुळे व्यापारी वर्गाला अनेक अडचणीला तोंड द्यावे लागत आहे. यालाच वैतागलेल्या दिंद्रुड येथील सर्व व्यापाऱ्यांनी येथील शिवाजीनगर भागात शनिवारी सकाळी बैठकीचे आयोजन केले होते. या बैठकीत यापुढे कुठल्याही परिस्थितीत बंद पाळण्यात येणार नसल्याचा ठराव सर्वानुमते पास करण्यात आला. येथील प्रतिष्ठित नागरिक युवराज ठोंबरे, बंडूजी खांडेकर, प्रदीप ठोंबरे, संतोष स्वामी, पत्रकार संघाचे अध्यक्ष अमोल ठोंबरे यांच्या प्रमुख उपस्थितीत व्यापारी महासंघाची स्थापना करण्यात आली. संघाच्या पदाधिकाऱ्यांची यादी यावेळी सर्वानुमते जाहीर करण्यात आली. व्यापाऱ्यांच्या अडीअडचणी सोडवण्यासाठी व्यापारी महासंघ दिंद्रुड ही संघटना काम करणार आहे. व्यापारी महासंघाचे अध्यक्षपदी उद्योजक प्रकाश ठोंबरे, उपाध्यक्ष गणेश मायकर व परमेश्वर ठोंबरे, सचिव गणेश काटकर, कोषाध्यक्ष पांडुरंग झोडगे, सहसचिव संजय बडे, सदस्य पदी पद्माकर मुंडे, शहाजी काशीद, सय्यद शायक, सुरेश पासंगे, महेश ठोंबरे, मुन्ना ठोंबरे यांची एक मुखाने निवड करण्यात आली. यावेळी शेकडो व्यापारी उपस्थित होते.

# दिव्यांग विद्यार्थ्यांसोबत बाळराजे पवार यांचा वाढदिवस साजरा

**गेवराई । प्रतिनिधी**

**स्वच्छ गेवराई, सुंदर गेवराईचे जनक लोकप्रिय युगपुरुष बाळराजे दादा पवार यांच्या वाढदिवसानिमित्त अनावश्यक खर्चाला फाटा देवून सौ.गीताभाभी बाळराजे पवार यांच्या उपस्थितीत शनिवार दि.२१ डिसेंबर रोजी शहरातील ताकडगाव रोड, गेवराई येथील दिव्यांग शाळेत एलसीडी टीव्ही भेट देत विद्यार्थ्यांना फळ वाटप करून सामाजिक उपक्रमांनी वाढदिवस साजरा करण्यात आला.**

गेवराई शहरातील मुकबधीर व मतिमंद निवासी विद्यालय येथे बाळराजे पवार मित्र मंडळाच्या पुढाकाराने अनावश्यक खर्चाला फाटा देत बाळराजे दादा पवार यांचा दिव्यांगांच्या निवासी शाळेत एलसीडी टीव्ही सप्रेम भेट देत


अनावश्यक खर्चाला फाटा ; गिताभाभी पवार यांच्या हस्ते एलसीडी टीव्हीसह फळ वाटप

विद्यार्थ्यांना फळ वाटप करुन सामाजिक उपक्रमाने वाढदिवस साजरा करण्यात आला. यावेळी सौ.भाग्यश्री लक्ष्मण पवार, सौ. रत्नमाला मोटे, नितीन शेटे, राम पाटेकर, दिनेश भंडारी, इम्रान पठाण, आसिफ शेख, राम सोलट, दत्ता गिरी, सोहेल शेख, पवन दहिवाळ सह शाळेतील शिक्षक , शिक्षकेत्तर कर्मचारी व दिव्यांग विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी संस्थेच्या वतीने संयोजकांचे आभारपत्र देऊन आभार व्यक्त करण्यात आले.

# महाराष्ट्र केसरी सिकंदर शेखचा पंजाब केसरी भोला ठाकूर सोबत रविवारी होणार कुस्तीचा सामना

## देवदहिफळ येथे पटेल युवा केसरी पुरस्काराचा मानकरी कोण ठरणार?

दिंद्रुड । प्रतिनिधी

धारूर तालुक्यातील देवदहिफळ येथे पटेल युवा प्रतिष्ठानच्या वतीने भव्य कुस्तीच्या दंगलीचे आयोजन रविवारी करण्यात आले आहे. महाराष्ट्र केसरी सिकंदर शेख विरुद्ध पंजाब केसरी भोला ठाकूर याचा सामना या दंगलीत होणार असून या सोहळ्यात उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

बीड जिल्ह्यात प्रथमच राष्ट्रीय पातळीवरील पहिलवानांच्या कुस्त्या देवदहिफळ येथे आयोजित करण्यात आल्या आहेत.

या दंगलीत महाराष्ट्रातील नामवंत पैलवान संदीप तिडके चा सामना सुमित बारस्कर सोबत, पृथ्वीराज वनवे चा राजू कदम,कृष्णा पवार चा अबू चाऊस, मोनू सिंग चा उमर शेख विरोधात होणारा सामना रोमहर्षक असणार आहे. बीड जिल्ह्यातील देवदहिफळ हे बालाघाट डोंगराच्या भागातील ठिकाण आहे. या भागात हजारो पैलवान घडत आहेत. महाराष्ट्र केसरी शिवाजी केकान यांच्यासारखी मार्गदर्शक पैलवान मंडळी कुस्त्यांच्या फडांना प्रोत्साहन देण्याचे काम करते. यातच बीड जिल्ह्यातील पटेल युवा प्रतिष्ठानच्या वतीने राज्य पातळीवरील कुस्तीच्या फडातील नामांकित पैलवान देवदहिफळ येथे कुस्ती सामन्यासाठी आमंत्रित केले आहेत. महाराष्ट्र केसरी सिकंदर शेख व पंजाब केसरी भोला ठाकूर यांच्या नियोजित कुस्ती संपन्न होणार असून पटेल युवा केसरीचा मानकरी कोण होणार ? हा सामना पाहण्यासाठी हजारोंच्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजक मतीन शेख सह देव दहिफळ ग्रामस्थांनी केले आहे.

# घरकुल मंजुरीच्या फायलीत घोळ केल्यामुळे पंचायत समितीमध्ये दारूड्याचा धिंगाणा

जालना । प्रतिनिधी

घरकुल फायदे मध्ये घोळ केल्यामुळे दारूच्या नशेत बदनापुर पंचायत समिती कार्यालयात एका व्यक्तीने धिंगाणा घालून कर्मचाऱ्याला शिवीगाळ करून धमक्या दिल्याप्रकरणी एका दारुड्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

यासंदर्भात अधिक माहिती अशी की बदनापूर पंचायत समिती कार्यालयातील कर्मचारी सचिन विलास दांडगे है ऑफिसमध्ये काम करीत असताना श्रीकांत बबन गुठे यांनी धिंगाणा घातल्याप्रकरणी

संशयीत आरोपीविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला. हा दारु पिवून दारुच्या नशेत पंचायत समिती बदनापुर येथे येवुन म्हणाला की, माझी घरकुल योजनाची फाईल मला दाखवा माझ्या घरकुलाच्या फाईलचे काय केले असे म्हणाला मी त्यांना म्हणालो की तुम्ही तुमच्या घरकुलाची फाईलची ओसी दाखवा असे मी त्यांना म्हणालाच त्यांनी मला शिवीगाळ करण्यास सुरवात केली. आम्ही व स्टॉफच्या लोकांनी त्याला समजावून सांगितले असता तो तेथुन काही न बोलता निघुन गेला नंतर दुपारी दोन ते अडीच वाजेच्या सुमारास श्रीकांत बबन गुठे हा परत पंचायत समिती बदनापुर येथे आणखीन दारु पिवुन आला व आम्हाला सर्वांना शिवीगाळ करून आमच्या ऑफिसच्या खुर्ची, टेबल ईतरअ फेकले तसेच मंजीत पाडुरंग चापटबुक्यांनी मारहाण करुन जीवे मारण्यच्या धमक्या दिल्या, यामुळे सचिन दांडगे यांनी पोलीस ठाण्यात तक्रार दिली या प्रकरणी गुठे याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## नवीन पोलीस अधीक्षक यांचे बीड जिल्ह्यात स्वागत!

# परळी शहर आणि तालुक्यातील अवैध धंदे बंद करण्यासाठी कठोर पावले उचलावीत - राजेभाऊ फड

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

बीड जिल्ह्याचे तत्कालीन पोलीस अधीक्षक अविनाश बारगळ यांची तडकाफडकी बदली करून नवीन पोलीस अधीक्षक म्हणून नवनीत कांवत हे रुजू होत आहेत. बीड जिल्ह्यात बिघडलेली कायदा आणि सुव्यवस्था लक्षात घेता हा निर्णय घेत असल्याची घोषणा मुख्यंत्र्यांनी विधिमंडळात केली. आता नवीन पोलीस अधिक्षकांकडून जनतेच्या मोठ्या अपेक्षा आहेत. बीड जिल्ह्यातील आणि परळी शहर व तालुक्यातील अवैध धंद्यांना पायबंद घालावा



ज्यामुळे गुन्हेगारी कमी होईल अशी अपेक्षा राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे युवक नेते राजेभाऊ फड यांनी व्यक्त केली आहे.

बीड जिल्ह्यात मागील काही महिन्यांत अनेक विचित्र घटना घडल्याने जिल्ह्याचे नाव देशभरात बदनाम झाले आहे. गुन्हेगारांना कायद्याचा अजिबात धाक राहिलेला नाही. खून, दरोडे, चोऱ्यामाऱ्या, अवैध दारू विक्री, अवैध गुटखा, वाळू माफिया, तसेच अनेक प्रकारचे अवैध धंदे चालत आहेत. यावर नावे पोलीस अधीक्षक नवनीत कांवत यांनी विशेष लक्ष घालून क्लीनअप मोहीम हाती घ्यावी तसेच परळी आणि तालुका परिसरात चालू असलेल्या अनेक अवैध धंद्यांना पायबंद करावा. यामुळे येथील कायदा आणि सुव्यवस्था सुरळीत होईल. तर बदनाम होत असलेले जिल्ह्याचे नाव आणि प्रतिमा सुधारणेसाठी पोलीस प्रशासनाने कठोर पावले उचलावीत अशी मागणी राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे युवक नेते राजेभाऊ फड यांनी केली आहे.

# संपादकाला अरेरावी करणाऱ्या आघाव यांच्यावर कारवाई करा

## मराठी पत्रकार परिषदेचे विश्वस्त एस.एम. देशमुख यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्हयातील सामांन्य माणूस दहशतीखाली आहे आता माध्यमांवर देखील दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न होत आहे, हे संतापजनक आणि निषेधार्थ आहे.. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या घटनेची दखल घेऊन आगाव यांच्यावर कारवाई करावी'' अशी मागणी मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख यांनी केली आहे..



मस्साजोग मधील घटनेनं संपूर्ण महाराष्ट्र सुन्न झालेला असताना बीडमधून येणारया नकारात्मक बातम्या थांबता थांबत नाहीत..त्यामुळं बीडमध्ये चाललंय काय? बीडमध्ये कायदा आणि सुव्यवस्था स्थिती अस्तित्वात आहे की नाही असं म्हणायची वेळ आली आहे.

बीड येथील दैनिक'' वास्तव'' चे संपादक तथा डिजिटल मिडिया परिषदेचे पदाधिकारी जितेंद्र शिरसाठ यांना जिल्हाधिकारी कार्यालयातील कर्मचारी श्रीमती आघाव यांनी दूरध्वनीवरून फोन करून अर्वाच्च भाषेत धमक्या दिल्या, तू तातडीने येऊन मला भेट अन्यथा तुला उचलून आणण्याची मला व्यवस्था करावी लागेल अशी अरेरावीची भाषा वापरली.. जितेंद्र शिरसाट यांनी जिल्ह्यातील अवैध खनिज उत्खनना संबंधी बातमी छापली होती. श्रीमती आघाव यांच्या अरेरावी मुळे जिल्ह्यातील माध्यम जगतात संताप व्यक्त होत आहे. आघाव यांच्यावर कठोर कारवाई व्हावी अशी मागणी डिजिटल मिडिया परिषदेचे राज्य अध्यक्ष अनिल वाघमारे यांनी केली आहे..

# जीवनेसाहेब, राजस्थानच्या प्रशिक्षण संस्थेला कधी हाकलणार बोगस प्रशिक्षण देऊन बीड जिल्ह्याला कोट्यावधी रुपयाचा चुना

**बीड । प्रतिनिधी**

राज्यस्तरावर बीड जिल्ह्यातील जलजीवन मिशनच्या प्रशिक्षणाची जबाबदारी राजस्थानच्या स्टुडंट्स रिलीफ सोसायटीला देण्यात आली. ज्यांना मराठीचा म कळत नाही त्यांच्यावर ग्रामीण भागातील पदाधिकाऱ्यांना प्रशिक्षित करण्याची जबाबदारी म्हणजे ही हास्यास्पद बाब आहे. यासाठी जे प्रशिक्षक नेमले तेही प्रशिक्षित नाहीत. थातूरमातूर प्रशिक्षण देऊन आणि बोगस सह्या करून बीड जिल्ह्याला कोट्यावधीचा गंडा घालणाऱ्या स्टुडन्ट रिलीफ सोसायटीला कधी हकलणार असा सवाल सर्वसामान्य नागरिक करीत

वास्तविक पाहता या प्रशिक्षणासाठी प्रशिक्षक निवडणे, जागा निश्चित करणे, त्यांना सोयी सुविधा देणे ही जबाबदारी संस्थेची असली तरी यावर लक्ष ठेवण्याची जबाबदारी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आणि स्वच्छता व पाणीपुरवठा विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांची आहे. याशिवाय ज्या तालुक्यात हे प्रशिक्षण चालू आहे त्या तालुक्यामध्ये मॉनिटरिंग करण्याची जबाबदारी तालुक्याचे गटविकास अधिकारी आणि विस्तार अधिकाऱ्यांची आहे. मात्र कोट्यावधी रुपये खर्च करून ग्रामीण भागातील पदाधिकाऱ्यांना प्रशिक्षित करणाऱ्या या प्रशिक्षणाचे गांभीर्य कोणालाच असल्याचे दिसत नाही. थातूरमातूर प्रशिक्षण देऊन आणि बोगस सह्या करून या प्रशिक्षणासाठी शासनाकडून कोट्यावधी रुपयाचा मलिदा लाटला जात आहे. याकडे लक्ष देण्याची जबाबदारी जिल्हा परिषदेच्या अधिकाऱ्यांची आहे. याचा निधी राज्यस्तरावर असला तरी मुख्य कार्यकारी अधिकारी आणि उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अभिप्राया शिवाय हा निधी संस्थेला मिळत नाही. हे तितकेच खरे त्यामुळे सर्वात जास्त जबाबदारी जिल्हा परिषदेच्या अधिकाऱ्यांची आहे. मात्र या प्रशिक्षणाकडे सपशेल दुर्लक्ष होत आहे. राजस्थानच्या स्टुडंट्स रिलीफ सोसायटीने गेल्या काही दिवसाचे प्रशिक्षण घेतले त्यासाठी यशदाचे प्रशिक्षित प्रशिक्षक नेमणे गरजेचे असताना आणि हे प्रशिक्षक जिल्ह्यातीलच असावेत असे अध्यादेश असतानाही या संस्थेने बाहेरील लोक आणून प्रशिक्षण घेतले. जिल्ह्यामध्ये यशदाचे प्रशिक्षण घेतलेले प्रशिक्षक मोठ्या प्रमाणात आहेत. मात्र त्यांना जाणीवपूर्वक डावलून थातूरमातूर प्रशिक्षण घेऊन कोट्यावधी रुपये लाटण्याच्या नादामध्ये या संस्थेने बाहेरचे लोक आणले. हे सर्व प्रशिक्षण नियमबाह्य असून ज्यांना हे प्रशिक्षण द्यायचे आहे त्यांनाही व्यवस्थित निरोप दिले जात नाहीत. कमीत कमी लोक या प्रशिक्षणाला यावेत अशी व्यवस्था या संस्थेने करून ठेवली आहे. या संस्थेचे जिल्ह्यातील काही दलाल संस्थेसाठी काम करत असून स्वतःच्या फायद्यासाठी जिल्ह्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान केले जात आहे. आता यात मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी लक्ष देऊन ही संस्था हद्दपार करावी अशी मागणी जिल्ह्यातील नागरिकांतून होत आहे.

**प्रशिक्षणासाठी असलेला जीआर काय सांगतो**

या प्रशिक्षणासाठी राज्य व्यवस्थापन कक्षा पंचायत राज च्या वतीने एक अध्यादेश जारी केलेला आहे. या अध्यादेशानुसार समृद्ध गाव, स्वच्छ गाव, हरित गाव करण्यासाठी प्रत्येक ग्रामपंचायती ला प्रशिक्षण असावे यामध्ये सरपंच आरोग्य पोषण, स्वच्छता व पाणीपुरवठा समितीचे अध्यक्ष, आरोग्य पोषण स्वच्छता पाणीपुरवठा समितीचे महिला सदस्य, ग्रामसेवक बचत गटाचे प्रतिनिधी, जलसुरक्षक, अंगणवाडी सेविका, आशा वर्कर आदींचा सहभाग असावा. यासाठी जिल्ह्यातून पंधरा अनुभवी प्रवीण प्रशिक्षकांची निवड मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी करावी. यासाठी यशदाचे प्रशिक्षण पूर्ण झालेले असावे.प्रशिक्षणाच्या प्रशिक्षकांचे प्रशिक्षण हे राज्य व्यवस्थापन कक्ष , पंचायत राज ,राज्य ग्रामीण विकास संस्था, यशदा, युनिसेफच्या भागीदारी संस्था या ठिकाणी झालेले असावे. या प्रशिक्षित प्रशिक्षकांची यादी यशदा कडून प्राप्त करून घ्यावी. प्रशिक्षकांची बैठक आयोजित करून त्यांना प्राधान्यक्रम निश्चित करून द्यावा. संख्येनुसार प्रशिक्षकांची निवड करावी. यावर लक्ष ठेवण्याची जबाबदारी.प. पंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी नोडल अधिकारी म्हणून काम पाहावे. यासाठी प्रशिक्षकांचे एकूण पाच गट तयार करावेत .यामध्ये एक अभियंता, एक भूजलतज्ञ, एक समाज शास्त्रज्ञ किंवा एक प्रवीण प्रशिक्षक असे गट तयार करून याचे प्रशिक्षण पूर्ण करावे. जिल्ह्यामध्ये पाच ठिकाणी प्रशिक्षण वर्ग घेता येतील अशी व्यवस्था करावी. प्रवीण प्रशिक्षकाशिवाय अन्य कोणत्याही प्रशिक्षकाची सेवा यासाठी वापरू नये .तीन दिवसाचे प्रशिक्षण घेणे अपेक्षित आहे. एका वर्गामध्ये ५० प्रशिक्षणार्थी असावेत .त्याला मेळाव्याची स्वरूप येऊ नये. प्रशिक्षणार्थी साठी वाहन व्यवस्था असावी. निवडलेले गाव हे प्रशिक्षण स्थळापासून ४० किलोमीटरच्या अंतराच्या आत असावे. या ठिकाणी उत्तम दर्जाची व्यवस्था असावी. या प्रशिक्षणा दरम्यान यशदामार्फत प्रशिक्षण साहित्य उपलब्ध करून द्यावे .ही जबाबदारी उपमुख्य कार्यकारी अधिकारी पंचायत यांची राहील. युनिसेफने सुचविलेल्या भागीदारी संस्थांनी हे प्रशिक्षण द्यावे. त्यांना उत्तम भाषा माहीत असावी. यासाठी प्रशिक्षण व्यवस्थित होते की नाही हे पाहण्यासाठी त्रयस्थ संस्थेने भेटी देणे आवश्यक आहे. प्रशिक्षणा दरम्यान सर्व बाबींची तपासणी त्रयस्थ संस्थेने करावी. अशा सूचना असतानाही या सूचनाचे पालन केले जात नाही. राजस्थानची ही संस्था सर्व सूचना धाब्यावर बसून थातूरमातूर प्रशिक्षण देऊन कार्यक्रम गुंडाळून कोट्यावधी रुपयाचा मलिदा लाटत आहे. ही संस्था लवकरात लवकर जिल्ह्यातून हद्दपार करावी आणि हे काम महाराष्ट्रातील संस्थेला देण्यात यावे. अशी मागणी जिल्हाभरातून केली जात आहे.

Har Ghar Jal
Jal Jeevan Mission

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनातील आयोजकांना धमकीचे फोन; नाव बदलण्याची मागणी

पुणे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाला दरवर्षी वादाची किनार पाहायला मिळते यावर्षी देखील असाच काहीसा प्रकार दिसून येत आहे. यावेळी होणारं ९८ वं साहित्य संमेलन हे दिल्लीत पार पडणार आहे. मात्र, या कार्यक्रमाच्या आयोजकांना धमकीचा फोन येत आहे, याबाबत त्यांना धमकावलं जात आहे. याबाबत त्यांनी बोलाताना सांगितलं की, फोन करणारे त्यांची मागणी सांगून धमक्या देत आहेत.



अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे आयोजक संजय नहार म्हणाले, या कार्यक्रमासाठीची पत्रकार परिषद पार पडली. त्यानंतर आम्ही त्याबाबची माहिती असणारे दोन पानांचे लिफलेट वाटले. तेही अगदी फायनल नव्हते. त्यात आम्ही काही नाव दिली होती.दिल्लीत होणाऱ्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या नगरीला छत्रपती शिवाजी महाराजांचे तर संमेलनाच्या मुख्य सभागृहाला डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे नाव देऊ, अन्य दोन सभागृहांना काकासाहेब गाडगीळ आणि लोकमान्य टीळकांचे नाव देऊ अशा आम्ही घोषणा केल्या. भूमिकेमध्ये आम्ही दोन्ही विचारांच्या टोकांना आम्ही साहित्य संमेलनाने नेहमी स्वीकारलं आहे. एकीकडे स्वातंत्र्यवीर सावरकर संमेलनाचे अध्यक्ष होते. आम्ही सर्वांचा उल्लेख केलेला होता. काही गैरसमजातून अशी बातमी आली की, सावरकरांचं नाव मुख्य सभागृहाला दिलं पाहिजे. पण, मुख्य सभागृहाला डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचं नाव द्यायचं असं ठरलं आहे. त्यामध्ये सर्वांची नावे आहेत. कुठेकुठे नाव द्यायची हे मंडळाचं ठरलेलं असतं आमची त्यामध्ये मोठी भूमिका नसते, पण त्या गैरसमजातून काही फोन यायला लागले, आधी विनंती करायचे आणि नंतर धमकी द्यायला लागले अशी माहिती यावेळी बोलताना संजय नहार यांनी दिली आहे.

माझ्या सोबत काम करणाऱ्यांना देखील फोन येत होते. यावेळी पहिल्यांदा विनंती करायचे नंतर स्वरुप धमकीचं होतं. फोन करणाऱ्या काहींनी तर नथुराम गोडसेचे नाव देण्याचाही आग्रह धरला. आम्ही त्याला जे काही म्हणणे आहे ते

लेखी महामंडळाकडे द्यायला सांगितले. त्यावर चर्चा करून योग्य निर्णय घेतला जाईल. काल दिवसभर फोन आले, माझे सहकारी, कुटूंबातील काहींनी फोन आले, काहींनी नावे सांगितली, काहींनी मेल केले. तर काहींनी मेसेज केले आहेत, अशी माहिती त्यांनी यावेळी दिली आहे. मेसेजवर, मेलवर ते विनंती करत होते, तर काही जण हे केलं नाही तर त्रास होईल तुम्हाला. महाराष्ट्राच्या आस्मितेसाठी संघर्ष करावा लागेल, असंही काही जण सांगत होते. आम्ही आयोजक आहोत. काही निर्णय घ्यायचा असेल तर त्याचा निर्णय महामंडळ घेईल. त्यामुळे तुम्ही त्यांना लिखीत द्या असं सांगितलं आहे, महामंडळांना सांगून काही बदल केले जातील, काहींनी संतांची नावे सुचवली होती. दरम्यान शरद पवार हे स्वागताध्यक्ष आहेत, तर पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्घाटनाला येणार आहेत. मोदींच्या उपस्थितीत विज्ञान भवनमध्ये संमेलनाचे उद्घाटन होईल तर बाकी साहित्य संमेलन तालकटोरा स्टेडीयमवर होईल. आम्ही स्वातंत्रवीर सावरकरांच्या कार्याचा, मराठी भाषेबाबतच्या कार्याचा यथोचित गौरव केला आहे, महामंडळाला याबाबत कल्पना दिली आहे. काही नावे आम्ही सन्मानाने घ्यावी अशा सूचना देण्यात आल्या आहेत, असंही पुढे संजय नहार म्हणाले. याबाबत पोलीसांकडे तक्रार करणार नाही. मात्र काम असंच पुढे सुरु ठेवणार आहे, हे गैरसमजातून होत आहे, दोन्ही बाजूने गैरसमज झाले, त्यामुळे आम्ही तक्रार करणार नसल्याचंही त्यांनी म्हटलं आहे.

# युवक काँग्रेसचे 'रस्ता रोको' आंदोलन; अमित शहांच्या राजीनाम्याची मागणी



पुणे । प्रतिनिधी

पुणे शहर व जिल्हा ग्रामीण युवक काँग्रेसकडून केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी तसेच लोकसभा विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यावर खोटच्या केसेस दाखल केल्याच्या निषेधार्थ व भारतीय युवक काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष उदय भानु चिब यांना आसाम पोलीसांनी बेकायदेशीर अटकेच्या निषेधार्थ पुणे शहर युवक काँग्रेसतर्फे आंदोलन करत रस्ता रोको करण्यात आला.

यावेळी युवक काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी बालगंधर्व चौकात एकत्र येऊन रस्ता रोको आंदोलन करण्यात आले. महाराष्ट्र युवक काँग्रेस सहप्रभारी एहसान खान, पुणे शहर युवक काँग्रेसचे अध्यक्ष सौरभ अमराळे, महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे सरचिटणीस अक्षय जैन, महाराष्ट्र प्रदेश युवक सरचिटणीस रोहन सुरवसे-पाटील, प्रथमेश आबनावे, पुणे युवक जिल्हाध्यक्ष उमेश पवार, मेघश्याम धर्मावत, आनंद दुबे, ऋषीकेश वीरकर, अभिजित चव्हाण, सद्दाम शेख, मुरलीधर बुधराम, धनराज माने, मारुती तलवारे, हर्षद हांडे, पवन खरात आणि युवक काँग्रेसचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भोर-मांढरदेवी घाट रस्ता ५ जानेवारीपर्यंत बंद

वाई । प्रतिनिधी

पुढील महिन्यात मांढरदेवी (ता. वाई) येथील श्रीकाळूबाई देवीची यात्रा होत आहे. या पार्श्वभूमीवर कापूरव्होळ-भोर-मांढरदेवी रस्त्याचे काम पूर्ण करण्यासाठी ५ जानेवारीपर्यंत बंद ठेवण्यात आला आहे. प्रभारी जिल्हाधिकारी संतोष पाटील यांनी याबाबतचा आदेश दिला आहे.



भोर-मांढरदेवी रस्त्याचे रुंदीकरण व सिमेंट रस्ता करण्याचे काम सुरू आहे. या कामाला वाहनांचा अडथळा निर्माण होत असल्याने कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम दक्षिण विभाग यांच्या मागणीनुसार कापूरव्होळ- भोर-मांढरदेवी रस्ता ५ जानेवारीपर्यंत जिल्हाधिकारी यांच्या आदेशानुसार बंद करण्यात आला आहे. पर्यायी रस्त्याने वाहतूक वळविण्यात आली आहे. श्रीक्षेत्र मांढरदेवी काळेश्वरी देवीची यात्रा १२ जानेवारी ते २९ जानेवारी या कालावधीत होणार आहे. या यात्रेसाठी राज्यातून मोठ्या प्रमाणात भाविक येत असतात. सदर यात्रा कालावधीमधील काळेश्वरीदेवीच्या दर्शनासाठी भोर, आंबाडेमार्गे आंबाडखिंड घाटातून काळेश्वरी देवीला जाणार्या भाविकांची संख्या मोठी आहे. सद्य:स्थितीमध्ये भोर ते मांढरदेवी रस्त्याचे रुंदीकरण व सिमेंट रस्ता करण्याचे काम सुरू आहे. सदर रस्त्याचा बहुतांश भाग हा नादुरुस्त असून, घाटात सुरक्षेच्या दृष्टीने उपाययोजना झालेल्या नाहीत. रस्त्यावर वाहनांची वर्दळ मोठ्या प्रमाणावर असते. आंबाडखिंड घाट मांढरदेवी प्रारंभपर्यंत सिंगल रोड आहे. घाट प्रारंभ ते घाटमध्य भागापर्यंत रोडचे काम केलेले नाही. घाटाच्या मध्यभागी नवीन रोडचे काम सुरू आहे. त्या ठिकाणी एकाबाजूने वाहतूक सुरू आहे. सदर ठिकाणी मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होऊ शकते. त्याठिकाणी संरक्षक कठडे नसल्याने अपघाताची शक्यता असल्याने रस्ता बंद करण्यात आला आहे.

# अमित शहा यांच्या विरोधात शिवसेनेचा रास्ता रोको

पुणे : केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी संसदेत बोलताना भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना उद्देशून केलेल्या अवमानकारक वक्तव्याविरोधात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने शुक्रवारी रास्ता रोको आंदोलन करण्यात आले.

शहरप्रमुख संजय मोरे आणि गजानन थरकुडे यांच्या नेतृत्वाखाली दांडेकर पूल येथे करण्यात आलेल्या या आंदोलनात प्रदेश संघटक वसंत मोरे, प्रसिद्धिप्रमुख अनंत घरत, शहर उपप्रमुख प्रशांत राणे, भरत कुंभारकर, शहर संघटक राजेंद्र शिंदे, विभागप्रमुख सूरज लोखंडे, मनीष जगदाळे, वैशाली कापसे, शीतल जाधव, कमल रोकडे, मथुरा



गवळी आदींसह शिवसैनिक आणि आंबेडकरप्रेमी सहभागी झाले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर का अवमान नहीं सहेगा हिंदुस्तान', 'बोला जय भीम, मी आंबेडकर... तू आंबेडकर...' अशा घोषणा या वेळी देण्यात आल्या.मोरे म्हणाले, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या देशाला बुद्धिचातुर्याने राज्यघटना दिल्यामुळेच आपण देशाचे गृहमंत्री म्हणून संसदेत आहात. आणि तिथे बसूनच आपण आंबेडकरांची अवहेलना करता, भाजपच्या पोटातले आपण ओठावर आणले. तडीपार गुन्हेगार असूनही त्यांना निवडणूक लढविण्याचा हक्क दिला. सभागृहात मानसन्मान मिळवून दिला.

# अफवा सिंहाची अन् निघाला बिबट्या

**शिरूर । प्रतिनिधी**

कोरेगाव भीमा (ता. शिरूर) येथे पोपट गव्हाणे यांच्या घरासमोर रात्रीच्या सुमारास सिंह सदृश प्राण्याने कुत्र्याची शिकार केल्याची घटना सीसीटीव्हीमध्ये कैद झाल्यानंतर सोशल मीडियावर सिंह आल्याची अफवा पसरली. मात्र, वन विभागाच्या पाहणीत सदर प्राणी बिबट्या असल्याचे उघड झाले.



वढू रोडलगत गव्हाणे यांच्या घराबाहेरील कुत्र्याची शिकार बिबट्याने केली. पूर्ण वाढ झालेला बिबट्या सीसीटीव्हीमध्ये कैद झाला. याबाबत सिंह असल्याची अफवा पसरली. शिरूर वन विभागाच्या वनपरिमंडल अधिकारी गौरी हिंगणे, नियतक्षेत्र वन अधिकारी बबन दहातोंडे, प्रमोद पाटील, वनविभाग रेस्क्यू टीमचे शेरखान शेख यांनी घटनास्थळी भेट देत सीसीटीव्हीची तपासणी केली असता कुत्र्याची शिकार करणारा प्राणी सिंह नसून बिबट्या असल्याचे उघड झाले. या वेळी ग्रामपंचायत सदस्य केशव फडतरे, पोपट गव्हाणे, भाऊसाहेब गव्हाणे, सुनील भांडवलकर, उदयकांत बामणे, सुनील खैरे आदी उपस्थित होते. परिसरातील नागरिकांनी रात्रीच्या वेळी घराबाहेर पडताना काळजी घ्यावी, शेतात जाताना आवाज करावा, मुलांना बाहेर एकटे सोडू नये, जनावरांना योग्य निवारा करावा, असे आवाहन वनपरिमंडल अधिकारी हिंगणे यांनी केले आहे. घटनास्थळी पिंजरा लावला जाणार असल्याचे दहातोंडे यांनी सांगितले.

# राष्ट्रीय ग्राहक दिनानिमित्त जिल्ह्यात विविध उपक्रम

**पुणे । प्रतिनिधी**

राष्ट्रीय ग्राहक दिनानिमित्त जिल्ह्यात मंगळवारी (ता. २४) विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमाचा नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा ग्राहक संरक्षक परिषदेचे सदस्य सचिव तथा जिल्हा पुरवठा अधिकारी महेश सुधळकर यांनी केले आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आवारात आयोजित कार्यक्रमात जिल्ह्यातील विविध शासकीय कार्यालयांतील योजना व तक्रार निवारणाबाबत माहिती प्रदर्शन भरविण्यात येणार आहे. नागरिकांमध्ये वस्तू व सेवा खरेदी करताना दर्जा तसेच वजन मापामध्ये होणाऱ्या फसवणुकीपासून सावधानता बाळगण्याबाबतचे संदेश, ग्राहकांच्या हक्कांचे संरक्षण व संवर्धन करण्यासाठी ग्राहकांच्या जबाबदाऱ्या, कर्तव्य आदीबाबत ग्राहकांमध्ये जागरूकता येण्याकरिता संदेश व माहिती देणारे विविध शासकीय कार्यालयांचे दालने लावण्यात आलेले आहेत, अशी माहिती सुधळकर यांनी दिली.

# वेळेत कर आकारणीसाठी पुणे पालिकेची विशेष मोहीम

**पुणे । प्रतिनिधी**

महापालिकेच्या बांधकाम विभागाने कर आकारणी विभागास भोगवटा पत्र दिल्यानंतरही तांत्रिक कारणांमुळे कर आकारणी वेळेत होत नाही. त्यामुळे अनेक सदनिकाधारकांना लाखो रुपयांची देयके अचानक मिळतात आणि त्यांचे धाबे दणाणून जातात. हे चित्र बदलण्यासाठी कर आकारणी विभाग विशेष मोहीम राबवून देयके अधिकाधिक वेळेत देण्यासाठी प्रयत्न करीत आहे.



महापालिकेच्या हद्दीत बांधकाम पूर्ण झाल्यानंतर पूर्णत्वाचा दाखला आणि भोगवटा पत्र दिले जाते. भोगवटा पत्र प्राप्त झाल्याच्या तारखेपासून मिळकतकराची आकारणी केली जाते. कर आकारणी वेळेत होऊन महापालिकेचे उत्पन्न वाढावे म्हणून भोगवटा पत्र दिल्यानंतर बांधकाम विभागाकडून कर आकारणी विभागाला तसे कळविले जाते. मिळकतकर विभागाने मिळकतकर धारक किंवा विकसकांना देयके देणे अपेक्षित आहे. बांधकाम विभागाने भोगवटा पत्र दिल्यानंतरही इमारती, त्यातील सदनिका व आस्थापनांची कर आकारणी पूर्ण होत नाही. अनेकदा मिळकतकराची चार ते पाच वर्षांच्या देयके एकाच वेळी दिली जातात. त्यामुळे मुळातच सदनिकांसाठी कर्ज काढलेल्या मिळकतदाराची कोंडी होते.

मिळकतकर आकारणी व कर संकलन विभाग हा प्रकार थांबवून इमारती, त्यामधील सदनिकांना देयके वेळेत देण्यासाठी प्रयत्न करणार आहे. ही मोहीम लवकरच पूर्ण होणार असल्याचे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले.

# गुटखा वाहतूक करणारा टेम्पो पकडला; १८ लाखांचा मुद्देमाल जप्त



**पुणे । प्रतिनिधी**

गुटखा विक्रीवर बंदी असताना बेकायदा गुटखा वाहतूक करणारा टेम्पो पोलिसांनी पकडला. पोलिसांनी टेम्पोतून आठ लाख ५८ हजारांचा गुटखा, तसेच टेम्पो असा १८ लाख ५८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी पोलिसांनी दोघांना अटक केली.

सौरभ उर्फ धनराज रामकृष्ण निंबाळकर (वय २४, रा. थोरवे शाळेसमोर, कात्रज), संग्राम बाळकृष्ण निंबाळकर (वय २६) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. त्यांच्याविरुद्ध भारती विद्यापीठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. राज्यामध्ये गुटखा, पानमसाला, सुगंधित तंबाखू, तसेच अन्य तंबाखूजन्य पदार्थाची विक्री आणि वापरास बंदी घालण्यात आली आहे. गुटखा बंदी असताना शहरातील पानपट्ट्यांवर गुटखा विक्री होत आहे. शुक्रवारी दुपारी भारती विद्यापीठ परिसरातील फालेनगर येथून गुटखा वाहतूक होणार असल्याची माहिती स्वारगेट पोलीस ठाण्यातील कर्मचारी संजय भापकर यांना मिळाली. पोलिसांच्या पथकाने सापळा लावून टेम्पो अडवला. टेम्पोची तपासणी करण्यात आली. तेव्हा टेम्पोत गुटख्याचा साठा आढळून आला. अटक करण्यात आलेले दोघे जण भाऊ असून त्यापैकी एकाविरुद्ध यापूर्वी गुन्हे दाखल झाले आहेत. दोघांनी शहरात गुटखा विक्री करण्यासाठी आणला होता. गुटखा कोठून आणला, यादृष्टीने पोलीस तपास करत आहेत. परिमंडळ दोनच्या पोलीस उपायुक्त स्मार्तना पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक संतोष कोळी, उपनिरीक्षक नीलेश मोकाशी, संजय भापकर, कुंदन शिंदे, राहुल तांबे, सागर केकाण, महेश बारवकर, मितेश चोरमोले यांच्यासह पथकाने ही कामगिरी केली

# शिक्षकावर बाल लैंगिक अत्याचाराचा गुन्हा दाखल

**रांजणगाव गणपती । प्रतिनिधी**

सोने सांगवी तालुका शिरूर येथील अनिल शेळके या शिक्षकावर बाल लैंगिक अत्याचार प्रकरणी रांजणगाव एमआयडीसी पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अनिल शेळके हा कारेगाव येथील प्राथमिक शाळेमध्ये शिक्षक म्हणून काम करत आहे. तसेच तो शिरूर तालुका शिक्षक सहकारी पतसंस्थेचा संचालक आहे.

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कारेगाव येथील मुलींची गैरवर्तन करणे, मुलींना बॅड टच करणे असे काही कृती हा अनिल शेळके करत होता. याबाबत पालकांनी शाळेतील इतर शिक्षकांशी मुख्याध्यापकांशी, व गावातील पदाधिकाऱ्यांची संपर्क साधून संबंधित शिक्षकाचा प्रताप कानावर घातल्यावर मुख्याध्यापक सुरेश बेंद्रे यांनी रांजणगाव एमआयडीसी पोलीस स्टेशनला तुला फिर्यादा दिली आहे. या फिर्यादीची दखल घेत रांजणगाव एमआयडीसी पोलिसांनी सोनेसांगवी येथील शिक्षक अनिल महादेव शेळके याच्यावर पोस्को कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. सदर आरोपीवर गुन्हा दाखल करून त्यास अटक करण्यात आले असल्याचे पोलीस निरीक्षक महादेव वाघमोडे यांनी सांगितले. ही कारवाई महिला पोलीस अधिकारी सविता काळे, अभिमन्यू कोळेकर ज्ञानेश्वर शिंदे व आर. बी. कर्डिले यांच्या पथकानें केली.

गावोगावी शाळेचा कारभार व्यवस्थित हाकण्यासाठी व शाळेच्या विकासाला मोलाची मदत होण्यासाठी शाळा व्यवस्थापन समिती यांची नेमणूक करण्यात आलेली आहे. मात्र या शाळा व्यवस्थापन समिती व शिक्षकांमधील वाढलेल्या सलगी मुळे व्यवस्थापन समित्यांचा शिक्षकांवर दबाव वाढण्याऐवजी, शिक्षक व्यवस्थापन समित्यांना जुमानत नसल्यामुळेच असे गैरकृत्य घडत आहेत. कारेगाव जिल्हा परिषद शाळेमधील शिक्षक अनिल महादेव शेळके (पदवीधर शिक्षक) यांनी कारेगाव जिल्हा परिषद शाळेमधील विद्यार्थिनींच्या बाबतीत केलेल्या गैर कृत्याबद्दल सदर शिक्षकावरती काल रात्री पॉस्को अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे आणि सदर शिक्षकास तत्काळ अटक देखील झालेली आहे . या सर्व प्रकरणांमध्ये रांजणगाव पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक वाघमोडे व गटविकास अधिकारी महेश डोके , गटशिक्षण अधिकारी कळमकर यांनी तत्परता दाखवून या नराधमाला तात्काळ गुन्हा दाखल करून अटक देखील केली त्याबद्दल या सर्व अधिकाऱ्यांवर कारेगाव ग्रामस्थां कडून कौतुकाचा वर्ष होत आहे.

# मुंबई-पुणे महामार्गावर टोलमाफी करा

**वडगाव मावळ । प्रतिनिधी**

जुन्या पुणे-मुंबई महामार्गावर वाहतूक कोंडी आणि अपघातांची समस्या लक्षात घेता जुन्या महामार्गावर आवश्यक त्या सर्व ठिकाणी उड्डाणपूल बांधावेत आणि संपूर्ण टोल माफी करावी, अशी आग्रही मागणी मावळचे आमदार सुनील शेळके यांनी हिवाळी अधिवेशनात केली.



वार्षिक पुरवणी मागण्यांवर चर्चा करताना आमदार शेळके यांनी महामार्गांवरील अपुऱ्या सुविधांवर कठोर शब्दांत भाष्य केले. आमदार सुनील शेळके म्हणाले, रस्ते बांधणीसाठी शेकडो कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असला तरी कामाचा दर्जा समाधानकारक नाही. अधिकारी व ठेकेदार यांच्या संगनमताने कामे निकृष्ट दर्जाची होत आहेत. त्यावर कोणाचाही अंकुश नाही. अनेक रस्त्यांवर जलदगतीने खड्डे पडत आहेत, ज्यामुळे प्रवाशांना अडथळे आणि अपघातांना सामोरे जावे लागत आहे. आमदार शेळके यांनी सांगितले की, शिळफाटा ते निगडी भक्ती-शक्ती चौक या मार्गावरील वाहतूक कोंडी टाळण्यासाठी रस्ता रुंदीकरण झाले पाहिजे. तसेच कार्ला फाटा, कान्हे फाटा, वडगाव फाटा, तळेगाव फाटा, सोमाटणे फाटा, देहूरोड सेंट्रल चौक आदी ठिकाणी उड्डाणपूल उभारणे आवश्यक आहे, अशी मागणीही त्यांनी केली. मावळ तालुक्यात मुंबई-पुणे जुना महामार्ग आणि एक्सप्रेस वे असे दोन मार्ग असूनही नागरिकांना टोलचा त्रास सहन करावा लागतो. मुंबईकरांसाठी टोलमाफी दिली गेली आहे, तशीच माफी जुन्या पुणे-मुंबई महामार्गावरही करण्यात यावी, अशी आग्रही भूमिका शेळके यांनी मांडली. तळेगाव परिसरात उभारल्या जाणाऱ्या उद्योग प्रकल्पांमध्ये स्थानिक भूमिपुत्रांना रोजगार देण्याचे आश्वासन पूर्ण करण्यात यावे, अशीही मागणी आमदार शेळके यांनी विधानसभेत केली. ह्युंदाई कंपनीसाठी जमिनी दिलेल्या स्थानिक शेतकऱ्यांच्या मुलांना प्राधान्याने रोजगार मिळावा आणि औद्योगिक प्रशिक्षणासाठी आयटीआय केंद्र स्थापन करावे, असेही त्यांनी सुचवले.

सरकारकडे ठोस उपाययोजनांची मागणी

आमदार शेळके यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाने रस्ते बांधणीची गुणवत्ता सुधारण्याबरोबरच वेळेत काम पूर्ण करण्यासाठी प्रयत्नशील राहावे, असे आवाहन केले. स्थानिक समस्या तातडीने सोडवून नागरिकांना दिलासा देण्यासाठी सरकारने पुढाकार घ्यावा, असे त्यांनी ठामपणे नमूद केले. रस्त्यांचे रुंदीकरण आणि गुणवत्तापूर्ण बांधकाम व्हावे, यासाठी ठेकेदारांवर कडक उपाययोजना लागू कराव्यात, अशी सूचनाही शेळके यांनी केली.